क्रमांक : ८३

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

### गुरुवार, दिनांक २ जून, २०२२ / ज्येष्ठ १२, १९४४ (शके)

### लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

८३. सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेचे सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन गुरुवार, दिनांक ३ मार्च, २०२२ रोजी सुरु होऊन शुक्रवार, दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या प्रथम सत्रातील एकूण १९४ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. त्यापैकी ३८ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आली होती व एकूण १५६ लक्षवेधी सूचनांची निवेदने प्रलंबित होती. त्यापैकी ६६ लक्षवेधी सूचनांची निवेदने सोमवार, दिनांक १८ एप्रिल, २०२२ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली असून ९० प्रलंबित निवेदनांपैकी २२ निवेदने गुरुवार, दिनांक १२ मे, २०२२ रोजीच्या पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आली आहेत. आता एकूण प्रलंबित ६८ निवेदनांपैकी १४ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : २ जून, २०२२.**

याची प्रत :

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website

\\MLS-DATASERVER\F Branch\ ... PC data\Bull Part 2\BULL PART YEAR 2022.docx

लक्षवेधीसूचना क्रमांक :-

**महाराष्ट्र विधान सभा**

**सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन**

**महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अन्वये श्री. प्रकाश आबिटकर विधान सभा यांनी दिलेली लक्षवेधी सूचना पूढील प्रमाणे आहे.**

कोल्हापूर वनविभागामध्ये मुख्य वनसंरक्षक क्लेमेंट बेन व उपवनसंरक्षक एस.एस.धुमाळ यांचे कार्यकाळामध्ये जिल्ह्यातील जंगलक्षेत्रामध्ये गवती कुरण वाढविणे व वनतळयांची कामे करणे अपेक्षित असताना तसे न होणे, परिणामी जंगलातील गवारेडे व जंगली टस्कर हत्तींचा दैनंदिन उपद्रव व हल्ल्यामध्ये दरवर्षी अनेक शेतकरी गंभीर जखमी व मृत्यमुखी होणे, याबाबत त्यांचा बंदोबस्त करण्याबाबत वेळोवेळी मुख्य वनसंरक्षक व मंत्रालय स्तरावर बैठका घेवूनही कोणतीही कार्यवाही न होणे, तसेच गवारेडे व हत्तींचा दिवसेंदिवस वाढत असलेला उपद्रवामुळे शेतीचे होणारे नुकसान यामुळे शेतकरी मेटाकुटीला येणे याबाबत उपाययोजना करणे गरजेचे असणे, तसेच जिल्ह्यातील लाकूड वाहतूकीसाठी वाहतूक पास वितरीत करण्या ऐवजी मोठ्या प्रमाणात अवैधपणे वाहतूक सुरु असणे याकरीता बेन व धुमाळ यांचे वरदहस्ताने व आपले आर्थिक हित जोपासून विना पास वाहतूक सुरु असणे, याबाबत शासनाने वाहतूक पास नियमवलीमध्ये आवश्यक त्या सुधारणा करणे गरजेचे असणे, जिल्हा नियोजन समितीकडून सन २०१४ ते १९ या कालावधीत वन विभाग (प्रा.) व वन्यजिव विभाग यांना वितरीत केलेल्या कोट्यावधी रुपयांच्या झालेल्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता असल्याबाबत केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी समितीने गंभीर आक्षेप नोंदवत झालेली सर्वच कामे मानकाप्रमाणे व निकृष्ट दर्जाची झालेली असल्याबाबत दिलेल्या स्वयंस्पष्ठ अहवालानुसार जिल्हाधिकारी कोल्हापूर यांनी दिनांक १८ नोव्हेंबर २०२१ रोजी मुख्य वनसंरक्षक प्रा. कोल्हापूर व वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, सह्याद्री व्याघ्र, कोल्हापूर यांना संबंधित दोषींवर महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) अधिनियम १९७९ अंतर्गत विभागीय/खातेनिहाय चौकशी प्रस्तावित करणे, परंतु अद्याप याबाबत कोणतीही कार्यवाही संबंधित खातेप्रमुख यांचेकडून करण्यात आलेली नसने, तसेच कोल्हापूर जिल्ह्यामध्ये संयुक्त वन व्यवस्थापन समित्या कागदोपत्री कार्यरत असणे, वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांचे माध्यमातून चुकीच्या व मनमानी पध्दतीने कामकाज सुरु असून शासनाच्या कोट्यावधी रुपयांचा अपहार करण्याचे काम दरवर्षी अधिकारी व कर्मचारी करत आहेत. समितीच्या कामांची निवड ग्रामसभेच्या मान्यतेने बंधनकारक असताना उप मुख्यकार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) जि.प.कोल्हापूर यांनी दिलेल्या अहवालामध्ये अशा कोणत्याही पध्दतीचे कामकाज कोल्हापूर जिल्ह्यातील कोणत्याही वनव्यवस्थापन समितीकडून करण्यात आले नसल्याचे नमूद करणे, जिल्ह्यातील समितींच्या कामकाजाची माहिती लोकप्रतिनिधी यांनी मागणी करुनही गेल्या १ ते दिड वर्षापासून देण्यात न येणे, याबाबत राज्य व केंद्र शासनाच्या कोट्यावधी रुपयांचा योग्य विनियोग करण्याचे काम मुख्यवनसंरक्षक व उप वनसंरक्षक यांचे असताना त्यांचेकडून अधिकारांचा गैरवापर करत अधिकारी व कर्मचारी यांचेवर दबाव आणत GeM Portal वर बेकायदेशीर पणे खरेदी करण्यात येणे, या सर्व बाबी गंभीर स्वरुपाच्या असून शासनाच्या कोट्यावधी रुपयाचा अपव्यय करणाऱ्या असणे, याबाबत शासनाने कारवाई करणेची आवश्यकता, दाजीपूर वन्यजीव अभयारण्याचा पर्यटनदृष्ट्या विकास करण्याकरीता मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १९ मे २०२१ रोजी झालेल्या बैठकीमध्ये ११० कोटी रुपयांच्या आराखड्यास तत्वत मान्यता देवून २५ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करणेचे आश्वासित करण्यात येणे, परंतु श्री.समाधान चव्हाण, वनसंरक्षक तथा व्याघ्र संचालक, सह्याद्री व्याघ्र राखीव कोल्हापूर यांचेकडून याबाबत कोणतेही कार्यवाही वेळेत न करणे. यास सर्वस्वी चव्हाण हे जबाबदार असून या सर्वबाबी गंभिर स्वरुपाच्या असणे, याबाबत शासनाने कोल्हापूर जिल्ह्यामध्ये वनविभागामध्ये चुकिच्या व मनमानी पध्दतीने सुरु असलेल्या कामकाजाची चौकशी करुन संबंधित वरिष्ठ अधिकारी यांचेवर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, त्याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया"

---

**मा. मुख्यमंत्री** **श्री. उदध्व ठाकरे**

**निवेदन**

कोल्हापूर वन विभागामध्ये सन २०१८-२०१९ ते २०२०-२०२१ या कालावधीमध्ये मानव वन्यजीव संघर्ष (प्रामुख्याने हत्ती व गवा) कमी करण्यासाठी वनक्षेत्रात ६० वनतळयांची कामे, ४१ गावांच्या वनसीमेवर वन्यप्राणी प्रतिबंधक चराची कामे, ३ ठिकाणी तार कुंपणाची कामे करण्यात आली आहेत तसेच चालू वर्षात ११ ठिकाणी तार कुंपणाची कामे सुरु आहेत. ३ रेस्क्यू वाहने उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. वन्यप्राण्यांमुळे झालेल्या नुकसानाची भरपाई करण्याकरीता सन २०१८-२०१९ ते २०२०-२०२१ या वर्षात रु. ९.२० कोटी आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे. वन्य प्राण्यांना सुनिश्चित भ्रमणमार्ग उपलब्ध व्हावा याकरीता ३ संवर्धन राखीव क्षेत्र घोषित करण्यात आले आहेत व २ संवर्धन राखीव क्षेत्र अधिसूचित करण्याची कार्यवाही सुरु आहे. याशिवाय हत्ती प्रवण क्षेत्रातील शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा व्हावा याकरीता वीज वितरण महामंडळ

व ऊस हंगामातील ऊस तात्काळ गाळपासाठी नेणेबाबत साखर कारखान्यांना विनंती करण्यात आली आहे. या व्यतिरिक्त दि. ०८.१२.२०२० रोजी मंत्रालयीन स्तरावर झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने क्षेत्रीय स्तरावर वार्षिक प्रर्वतन अहवालानुसार हत्तीप्रवण असलेल्या ३ वनपरिक्षेत्रात हाकारा गट तैनात करण्यात आले आहे. तसेच राज्यासाठी राज्य वन्यजीव कृती आराखडा (२०२१-२०३०) मंजुर करण्यात आला आहे. सदर आराखडयातील शिफारशीनुसार मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी दिलेल्या कृती निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

राज्यात महाराष्ट्र वन नियमावली २०१४ मधील तरतुदीच्या अनुषंगाने निर्गत पास देण्याची प्रक्रिया अवलंबली जाते. कोल्हापूर जिल्हयात अवैध वाहतुकीवर निर्बंध ठेवण्याकरीता ७ ठिकाणी तपासणी नाके कार्यरत आहेत. याव्यतिरिक्त १ वनक्षेत्रपाल, फिरते पथक सुध्दा कार्यरत आहेत. सन २०१८ ते २०२० या कालवाधीत खाजगी क्षेत्रातील विना निर्गत पास वाहतूक व विना परवाना वृक्षतोडीच्या ६४ प्रकरणात कार्यवाही करण्यात आली आहे. सदर कार्यवाहीत ३९३.२८८ घ.मी. जळाऊ लाकूड, ९५.७८५ घ.मी. इमारती लाकूड सरकार जमा केले आहे व नुकसानीपोटी रु.४.५५ लक्ष इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे. राज्यात निर्गत पास देण्याची प्रक्रिया सुलभ करण्याच्या दृष्टीकोनातून नागपूर वनविभागात प्रायोगिक तत्वावर ई-टीपी (Electronic Transit Pass) देण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे. सदर कार्यवाहीचे यशस्वीतेनुसार कोल्हापूर व राज्यातील इतर जिल्हयात ईटीपी सेवा उपलब्ध करुन देण्याचा मानस आहे.

सन २०१४ - २०१९ या कालावधीत जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत राधानगरी-भूदरगड-आजरा या मतदार संघात रु.६.३८ कोटी इतक्या रक्कमेची एकूण १४८ स्थापत्य कामे करण्यात आली आहेत. सदर कामांची चौकशी करण्याबाबत जिल्हा अधिकारी यांचेमार्फत समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीने तपासणी केलेल्या एकुण ३३ कामांपैकी २६ कामामध्ये त्रुटी आढळल्या आहेत. २३ कामांमध्ये चुकीच्या मोजमाप नोंदीमुळे रक्कमेचे अतिप्रदान झालेले असल्यामुळे सदर त्रुटी गंभीर स्वरुपाच्या असल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत अतिप्रदान झालेल्या रक्कमेच्या अनुषंगाने संबंधित कंत्राटदारांकडून रु. १.८६ लक्ष एवढी रक्कम वसूल करण्यात आली आहे व उर्वरित रक्कम वसूलीची कार्यवाही सुरु आहे. या कामांशी संबंधित ४ वनक्षेत्रपाल, ७ वनपाल व ९ वनरक्षक यांच्याविरुध्द दोषारोपपत्र बजाविण्यात आले आहेत व २ वनक्षेत्रपाल आणि १ सेवानिवृत्त वनपाल यांच्याविरुध्द दोषारोपपत्र बजाविण्याची कार्यवाही सुरु आहे. १ कामामध्ये देखभाल व संरक्षण विषयी उणीव दिसून आल्यामुळे १ वनरक्षक व १ वनपाल यांना सक्त ताकीद देण्यात आली आहे.

कोल्हापूर जिल्हयामध्ये ३८२ संयुक्त वनव्यवस्थापन समित्या आहेत. सदर संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांचा अध्यक्ष ग्रामसभेच्या मान्यतेने निश्चित केला जातो व संबंधित वनरक्षक किंवा वनपाल हा सदर समितीचा सचिव म्हणून काम पाहतो. सदर वनसमित्यांचे कामकाज शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार केले जाते. सन २०१८-१९ व सन २०१९-२० या कालावधीत झालेल्या खर्चाच्या अनुषंगाने ३२८ संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांचे सनदी लेखा परिक्षकामार्फत लेखा परिक्षण करण्यात आले आहे. संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांमार्फत घेतल्या जाणाऱ्या कामांची निवड ग्रामसभेचा ठराव पारीत करुन केलेली आहे. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रामपंचायत) जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी त्यांच्या अहवालात सर्व गावातील संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांनी कामाची निवड करताना ग्रामसभेचा ठराव घेतला असल्याचे नमूद केले आहे. मा.लोकप्रतिनिधींकडून विचारणा करण्यात आलेल्या माहितीपैकी उपवनसंरक्षक, कोल्हापूर यांच्या स्तरावर उपलब्ध असलेली माहिती त्यांनी दिनांक ४.८.२०२०, दिनांक १२.१.२०२१ व दिनांक २५.१०.२०२१ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिली आहे. वन व्यवस्थापन समितीच्या स्तरावरील माहिती पुढील १ महिन्यात मा.लोकप्रतिनिधी यांना उपलब्ध करुन देण्याची दक्षता घेण्यात येत आहे. सन २०१८-१९ व सन २०१९-२० या कालावधीत संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांकरीता वनक्षेत्रपाल स्तरावरुन एकूण रु.२९.६४ लक्ष इतक्या रकमेची खरेदी करण्यात आलेली आहे. सदर खरेदी GEM पोर्टलद्वारे मंजूर सुक्ष्म आराखडा व ग्रामसभेच्या ठरावानुसार करण्यात आली आहे. याबाबत मा.राज्यमंत्री (वने) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७.१०.२०२१ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत झालेल्या निर्णयानुसार अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मुख्यालय), सामाजिक वनीकरण, पुणे यांनी चौकशी अहवाल सादर केला आहे. सदर अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे संयुक्त वन व्यवस्थापन समितीमार्फत केली जाणारी कामे यांच्यावर संनियंत्रणासाठी व समितीमार्फत होणारी कामे सुव्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी अभ्यास करुन पर्याय सुचविण्यासाठी तज्ञ समिती गठित करण्यात आली आहे.

राधानगरी अभयारण्य पर्यटनदृष्टया विकसीत करण्याकरीता मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११.१२.२०२० रोजी सभा आयोजित करण्यात आली होती. सदर सभेमध्ये राधानगरी अभयारण्यात निसर्ग पर्यटन विषयी कामांच्या अनुषंगाने प्रथम टप्प्यात रु.२५ कोटीची तरतूद करणे व त्यानुषंगाने विकास आराखडा तयार करण्याबाबत निदेश देण्यात आले. याअनुषंगाने क्षेत्र संचालक, सहयाद्री व्याघ्र प्रकल्प यांनी निसर्ग पर्यटन विकास मंडळाकडे केलेल्या सादरीकरणाच्या अनुषंगाने निसर्ग पर्यटन मंडळाने दिनांक १४.३.२०२२ अन्वये रु. १७.५९ कोटी एवढया रकमेच्या विकास आराखडयास मान्यता दिली आहे. याव्यतिरिक्त सदर आराखडयात पर्यटन विषयक इतर बाबींचा समावेश करणेकरीता क्षेत्रीय स्तरावर कळविण्यात आले आहे. सदर आराखडयातील मंजूर तरतुदीच्या अनुषंगाने शासनाकडून निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

**********

लक्षवेधी सूचना क्रमांक :- ५

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

श्रीमती प्रतिभा धानोरकर, विधान सभा सदस्या यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा व्याघ्र प्रकल्पाला आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त करुन देण्यासाठी शासन प्रयत्नशील असणे, परंतु या ठिकाणी कोअर झोनमध्ये काम करणाऱ्या गाईड व ड्रायव्हर यांना अत्यंत अल्प मानधन मिळत असणे, जुन ते सप्टेंबर या पावसाळ्याच्या कालावधीत सदर प्रकल्पाचा कोअर झोन बंद असल्याने या कर्मचाऱ्यांना कोणतेही मानधन मिळत नसणे, याशिवाय कोरोनामुळे हा प्रकल्प दोन वर्षे पर्यटकांसाठी बंद असल्याने या कर्मचाऱ्यांना कोणतेही मानधन मिळाललले नसणे, त्यांची परिस्थिती हालाखीची होणे, त्यांच्या उपजिवीकेचा गंभीर प्रश्न उभा राहणे, या काळात या कर्मचाऱ्यांना शासनाकडून कोणतीही आर्थिक मदत मिळाली नसणे, ही मदत त्यातांना मिळावी असे या कर्मचाऱ्यांची मागणी असणे, तसेच पावसाळ्यात येथील पर्यटन बंद असल्याने या कर्मचाऱ्यांना पर्यायी रोजगार उपलब्ध करुन द्यावा किंवा मानधन द्यावे तसेच मानधनात वाढ करावी, अशी त्यांची आग्रही मागणी असतानाही त्यावरील कारवाईस शासनाकडून होत असलेला विलंब, परिणामी येथील गाईड व ड्रायवर यांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे याबाबत कारावयाची कार्यवाही व राज्य शासनाची प्रतिक्रिया."

---

**मा. मुख्यमंत्री** **श्री. उध्दव ठाकरे**

### निवेदन

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे कोर क्षेत्र ६२५.८२० चौ.कि.मी. असून त्यामध्ये ताडोबा राष्ट्रीय उद्यान व अंधारी वन्यजीव अभयारण्याचा समावेश आहे. त्या भोवतीचे क्षेत्र चंद्रपूर (बफर) वनविभागाचे ११०१.७७१ चौ.की.मी वनक्षेत्र आहे. तसेच या प्रकल्पांतर्गत गडचिरोली जिल्ह्यातील चपराळा व भामरागड वन्यजीव अभयारण्याचे एकूण क्षेत्र २३७.६१२ चौ.कि.मी. सुध्दा समावेश आहे. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे बफर क्षेत्रात ६, कोर क्षेत्रात ५ व आलापल्ली (वन्यजीव) उपविभागात २ वन परिक्षेत्रांचा समावेश आहे.

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प हा देशातील प्रमुख व्याघ्र प्रकल्पांपैकी एक आहे. या व्याघ्र प्रकल्पात वाघांच्या संख्येत सातत्याने वाढ होत आहे. सदर क्षेत्र हे वाघांसाठी उत्तम प्रजनन क्षेत्रांपैकी एक असून प्रकल्पाला महाराष्ट्र, मध्यप्रदेश, छत्तीसगड आणि तेलंगणा या राज्यातील ईतर व्याघ्र प्रकल्पांशी जोडणारे चांगले भ्रमणमार्ग असल्याने मध्य भारतातील वाघ, बिबट या प्राण्यांची वाढती संख्या या प्रदेशासाठी महत्त्वाची आहे. उत्तम संवर्धन मुल्य, पर्यावरणाचा समतोल राखणे याबरोबरच मुख्यत: शेती, निसर्ग पर्यटन आणि तत्सम आर्थिक बाबींवर अवलंबून असलेल्या आजुबाजूच्या गावांच्या आर्थिक उत्पन्नावर या प्रकल्पाचे महत्त्वाचे योगदान आहे.

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनान्वये व्याघ्र प्रकल्पातील कोर क्षेत्रातील पर्यटन माहे जुलै ते माहे सप्टेंबर या कालावधीत बंद ठेवण्यात येते. तसेच बफर क्षेत्रातील पर्यटन हे वर्षभर सुरु असते. कोव्हीड-१९ या विषाणुचा प्रादुर्भावा दरम्यान ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील पर्यटन बंद ठेवण्यात येवून पुन्हा सुरु करण्यात आले होते. तथापि दि. ०५.०२.२०२२ पासून कोर व बफर क्षेत्रातील पर्यटन पुनश्च सुरू आहे.

कोव्हीड काळामध्ये पर्यटन बंद असल्यामुळे गाईड, जिप्सीधारक व स्थानिकांना मदत करण्यासाठी सन २०२०-२१ मध्ये व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठानाचे खात्यामधील जमा रक्कम रु. ६,६६,३८८/- मधुन या व्याघ्र प्रकल्पामार्फत धान्य किट, मास्क, सॅनिटायझर, साबण, ईत्यादी साहित्य वाटप करण्यात आलेले आहे. तसेच अनेक सामाजिक संघटना, रिसोर्ट यांनी गाईड व जिप्सीचालकांना अन्न-धान्याचे वाटप केले आहे. व्याघ्र प्रकल्पाद्वारे गाईड व जिप्सीधारकांचा उदरनिर्वाह सुरु राहावा म्हणून वनामध्ये सुरु असलेल्या अग्नीसंरक्षकांची कामे तसेच तात्पुरत्या स्वरुपात असलेली कामे त्यांना देण्यात आली होती. व्याघ्र प्रकल्पाचे कोर क्षेत्रात मोहर्ली, नवेगाव, खुटवंडा, पांगडी, झरी व कोलारा असे सहा पर्यटन प्रवेशद्वार आहेत. व्याघ्र प्रकल्पाचे बफर क्षेत्रात जुनोना, आगरझरी, देवाडा, मामला, झरी-पेठ, केसलाघाट, पांगडी, बेलारा, सिरकडा, मदनापूर, कोलारा, अलीझंजा, नवेगाव-रामदेगी, निमढेला असे एकूण १४ प्रवेशद्वार असून जुनोना व पळसगाव रात्र गस्तीसाठी पर्यटकांना खुले आहे.

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाजवळील गावातील स्थानिकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने गाईड व जिप्सीधारकांची संघटना असून गाईड व जिप्सीधारक हे वनविभागातील कंत्राटी, स्थायी किंवा रोजंदारी स्वरुपातील कर्मचारी नाही. सदर जिप्सीधारकांची व गाईड यांच्या नोंदणीसाठी स्थानिक ग्रामपरिस्थितीकीय समितीद्वारा शिफारस केलेल्या धारकांची व्याघ्र प्रकल्पाच्या फाऊंडेशनद्वारे नोंदणी केली जाते. व्याघ्र प्रकल्पाचे कोर क्षेत्रात एकूण १२६ गाईड तर १५५ जिप्सीवाहन नोंदणीकृत आहे. तसेच बफर क्षेत्रात एकूण १२८ गाईड तर १९७ जिप्सीवाहन नोंदणीकृत आहे. जिप्सीधारक व गाईड यांचे गुणवत्तेमध्ये वाढ होण्यासाठी त्यांना व्याघ्र प्रकल्पाद्वारे वेळोवेळी प्रशिक्षण देण्यात येते. सोबतच त्यांना फाऊंडेशनद्वारे गणवेश, बुट, ईत्यादी साहित्य मोफत पुरविण्यात येते.

पर्यटकांनी सफारीसाठी नोंद करुन भरलेल्या शुल्कापोटी जिप्सी वाहन मोबदला व गाईड मोबदला ऑनलाईन प्रणालीद्वारे त्यांचे खात्यात जमा करण्यात येतो. माहे डिसेंबर २०२१ पूर्वी कोर विभागातील जिप्सीधारकांना प्रती वाहन रु. २७००/- व गाईड यांना रु. ३५०/- प्रमाणे मोबदला दिला जात होता. त्यानंतर मोबदल्यात वाढ करुन प्रती जिप्सी वाहन रु. ३०००/- व गाईड यांना रु. ५००/- प्रमाणे देण्यात येत आहे. तसेच बफर विभागातील जिप्सीधारकांना माहे जुन २०२१ पूर्वी प्रती वाहन रु. २२००/- व गाईड यांना रु. ३५०/- असा मोबदला दिला जात होता. त्यानंतर मोबदल्यात वाढ करुन प्रती जिप्सी वाहन रु. २५००/- व गाईड यांना रु. ५००/- प्रमाणे देण्यात येत आहे.

मागील तीन वर्षात ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील जिप्सीधारक व गाईड यांना देण्यात आलेला मोबदला खालीलप्रमाणे आहे :-

| वर्ष | कोर विभाग | | बफर विभाग | |
|---|---|---|---|---|
| | जिप्सीधारक मोबदला (रु) | गाईड मोबदला (रु) | जिप्सीधारक मोबदला (रु) | गाईड मोबदला (रु) |
| २०१९-२० | ५,५४,३१,०००/- | ७१,८५,५००/- | ५,०१,३१,४००/- | ७९,७५,४५०/- |
| २०२०-२१ | ३,९८,११,५००/- | ५१,६०,७५०/- | ४,१८,४४,०००/- | ६६,५७,०००/- |
| एप्रिल २०२१ ते डिसेंबर २०२१ | २,५४,६६,४००/- | ३३,०१,२००/- | ४,३८,२९,४००/- | ८५,९०,२००/- |

*******

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री. भिमराव तापकीर, श्री. अशोक पवार वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे:-

"पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्याचे क्षेत्रफळ राज्यातील काही जिल्ह्यांपेक्षाही जास्त असल्याने प्रशासनावर कामाचा प्रचंड ताण असणे, लोकसंख्या झपाट्याने वाढत असणे, या भागात प्रशासकीय कामे राबवणेसाठी नागरिकांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी स्वंतत्र गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी व कायमस्वरुपी तहसीलदार, नायब तहसीलदार या अधिकाऱ्यांची गरज आहे. त्यामुळे तालुका हवेलीचे महसूली विभाजन करून पूर्व हवेलीचे कार्यक्षेत्र मोठे असल्याने स्वतंत्र तहसील कार्यालय असावे, ह्या मागणी बाबत शासनाने करावयाची कार्यवाही व त्यावरील शासनाची प्रतिक्रिया."

---

**मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यात एकूण १६० महसूली गावे असून वाढते शहरीकरण व वाढत्या प्रशासकीय कामकाजामुळे शासन निर्णय क्र.प्राफेब-२०१०/व्हीआयपी२७७/पुनर्बांधणी ३/प्र.क्र.१५१/म-१०, दि.८.०२.२०१३ अन्वये हवेली तालुक्यांतर्गत अपर तहसिलदार कार्यालय, पिंपरी-चिंचवड स्थापन करण्यास यापुर्वी मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार मुळ हवेली तहसिल कार्यालय व अपर तहसिल कार्यालय,पिंपरी चिंचवड या कार्यालयामार्फत सद्यस्थितीत कामकाज सुरू आहे. हवेली तालुक्यातील एकूण १० महसूली मंडळ असून आकृतीबंधानुसार त्या मंडळापैकी ८ महसूली मंडळांसाठी १ तहसिलदार व २ महसूली मंडळांसाठी १ अपर तहसिलदार पद मंजूर आहे. तसेच तहसिलदार संजय गांधी योजना हे पद हवेली तालुक्यासाठी मंजुर व कार्यरत आहे.

सन २०११ च्या जनगणनेनुसार हवेली तालुक्याची एकूण २४,३२,५५१ इतकी लोकसंख्या आहे. सन २०११ च्या जनगणनेचा विचार करता, लोकसंख्या, नागरीकरण, शहरीकरण, औद्योगिकीकरण यामध्ये वाढ होत आहे. अपर तहसिल कार्यालय, पिंपरी-चिंचवड मधील समाविष्ठ गावे वगळता हवेली तहसिल कार्यक्षेत्रामध्ये १३० गावांचा समावेश आहे. हवेली तहसिल कार्यालयात दैंनंदीन कामकाज संदर्भात दर महिन्याला साधारणत: ७ ते ८ हजार विविध अर्ज प्राप्त होतात. तर शिधा पत्रिका मिळणेसाठी दरमहा साधारणत: ४०० ते ५०० अर्ज प्राप्त होतात. हवेली तहसिल कार्यालय नागरीक सुविधा केंद्रातर्फे दरमहा विविध प्रकारचे साधारणत: ६००० दाखले दिले जातात. त्याव्यतिरिक्त जमीन मागणी बाबत विविध व्यक्ती व संस्थांची प्रकरणे, जमीन खरेदी-विक्री व्यवहाराच्या नोंदी, विविध प्रकारच्या परवानग्या, तदनुषंगिक दावे, न्यायालयीन प्रकरणे, नैसर्गिक आपत्ती, पुरवठा विषयक कामकाज, नियोजन व

RoTA-H-147-(750-6-2022)

[कृ.मा.प

कार्यवाहीबाबत बैठका, निवडणुक कामकाज, जनगणना विषयक कामकाज इत्यादी कामकाज तहसिलदार हवेली यांना पहावे लागते. वाढती लोकसंख्या, नागरीकरण, शहरीकरण इ. बाबी विचारात घेता परिसरातील नागरीकांच्या सोयीसाठी तसेच प्रशासकीय यंत्रणा सक्षम करण्यासाठी हवेली तालुक्यासाठी विभागीय आयुक्त, पुणे यांचेकडून प्राप्त स्वतंत्र अपर तहसिल कार्यालय स्थापन करण्याबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरू आहे.

**************

(८८)

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

मा. श्री. सुनिल प्रभु, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

" चिखलदरा (जि.औरंगाबाद) येथे महावितरण कंपनीची सुमारे ३० हजार रोहित्रे वापराविना पडून असल्याचा धक्कादायक प्रकार दिनांक २२ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या सुमारास निदर्शनास येणे, रोहित्रासाठी अनेक शेतकऱ्यांनी अर्जाद्वारे मागणी करूनही त्यांना अद्याप रोहित्र उपलब्ध न होणे, रोहित्राअभावी हजारो शेतकऱ्यांची पिके जळून जाणे, यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात झालेले आर्थिक नुकसान, महावितरणच्या गलथान कारभारामुळे विद्युत रोहित्रे गेले दोन वर्षापासून पडून असणे, सदर रोहित्रे खरेदीसाठी लागलेला निधी विचारात घेता, यामध्ये महावितरणचेही नुकसान झाले असल्याने सदर प्रकरणाची शासनाने गंभीर दखल घेऊन चौकशी करून दोषींविरूध्द कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावायची कार्यवाही व प्रतिक्रिया."

## मा. मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

सद्यस्थितीत महावितणच्या कार्यक्षेत्रामध्ये एकूण ७,२९,०६६ थ्री फेज वितरण रोहित्रे कार्यन्वित आहेत. महावितरण तर्फे विविध क्षमतेचे वितरण रोहीत्रे विविध योजनांसाठी खरेदी करण्यात येतात. फेब्रुवारी २०२२ अखेर महावितरण कंपनीकडे ६,६८९ नविन थ्री फेज वितरण रोहित्रांचा साठा उपलब्ध आहे. खरेदी केलेले वितरण रोहीत्रे क्षेत्रीय कार्यालयांना वापरण्यासाठी मध्यवर्ती भांडारामध्ये उपलब्ध करुन दिले जातात. त्यास अनुसरुन औरंगाबाद परिमंडळासाठी चिखलठाणा मध्यवर्ती भांडारामध्ये दि.०७.०३.२०२२ रोजी विविध क्षमतेच्या २,७०३ रोहीत्रांचा साठा उपलब्ध आहे. सदर रोहित्रे माहे नोव्हेंबर २०२१ च्या सुमारास औरंगाबाद परिमंडळासाठी चिखलठाणा मध्यवर्ती भांडारामध्ये प्राप्त झाली आहेत.

नवीन खरेदी केलेले वितरण रोहीत्रे कॅपीटल वर्क अंतर्गत होणा-या नवीन कामांकरीता (एनएससी/डीपीडीसी/Ag पॉलीसी/एचव्हीडीएस इ.) वापरण्यात येतात. तसेच आपत्कालीन परिस्थितीत नियोजनाचा भाग म्हणून विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी वितरण रोहीत्रांचा साठा राखून ठेवला जातो.

सदर २,७०३ रोहित्रांपैकी २,२३३ (१६ केव्हीए व २५ केव्हीए) रोहित्रे उच्चदाब वितरण प्रणाली योजने अंतर्गत पैसे भरलेल्या (Paid Pending) कृषीपंपांना नविन विद्युत जोडणी देण्याकरीता वापरण्याचे नियोजित आहे. उर्वरित ४७० वितरण रोहित्रे कॅपीटल वर्क अंतर्गत होणा-या नवीन समर्पित कामांसाठी (एनएससी / डीपीडीसी /Ag पॉलीसी इ.) राखीव ठेवण्यात आले आहेत. त्यापैकी चालू वर्षात प्राप्त झालेल्या रोहीत्रांची संख्या ३३२ असुन ऊर्वरीत १३८ रोहीत्रे मार्च २०२१ पुर्वी प्राप्त झालेली आहे. एचव्हीडीएस, एनएससी, Ag पॉलीसी इत्यादी योजना या २ वर्षापेक्षा जास्त कालावधी

पासुन राबवण्यात येत असुन मार्च २०२० ते डिसेंबर २०२१ या कालावधीत लागू असलेल्या कोविड-१९ प्रतिबंधामुळे बऱ्याचश्या योजनांची कामे प्रलंबीत होती. उपरोक्त रोहीत्रे ही समर्पित योजनेसाठीच राखीव असल्यामुळे कामांची जशीजशी पुर्तता होते त्यानुसार रोहीत्र वितरीत करण्यात येतात. सबब ३० हजार रोहीत्रे २ वर्षापासुन वापराविना पडून असल्याची बाब संयुक्तीक नाही.

औरंगाबाद परिमंडळाअंतर्गत सन २०२१-२२ मध्ये रोहित्र नादुरुस्त होण्याचे प्रमाण १२.०३% एवढे आहे. माहे नोव्हेंबर - २०२१ ते माहे फेब्रुवारी - २०२२ या रब्बी हंगामाच्या कालावधीत कृषीपंप रोहित्रांवरील भार वाढल्यामुळे नादुरुस्त होण्याचे प्रमाण वाढले. परिणामी नादुरुस्त रोहित्रे बदलण्यास काही अंशी विलंब झालेला आहे.

महावितरण कंपनीतर्फे नादुरुस्त झालेली रोहीत्रे तातडीने बदलण्यात येतात त्याकरीता रोहीत्रावरील ग्राहकांच्या विज बिलाचा भरणा करण्याकरीता पाठपुरावा करण्यात येतो. शेतीपंपांचे चालु वीज बिल भरल्यानंतर नादुरुस्त रोहित्रे प्राधान्याने बदलण्यात येतात. औरंगाबाद परिमंडळाअंतर्गत सन २०२१-२२ मध्ये १२,६३२ रोहित्रे नादुरुस्त झाले असुन त्यापैकी आजपर्यंत ११,७७० इतके रोहित्रे बदलण्यात आले आहेत व उर्वरीत ८६२ रोहित्रे बदलण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

उपरोक्त ८६२ नादुरुस्त रोहित्रे बदलण्यासाठी औरंगाबाद परिमंडळा अंतर्गत रोहित्रांचा पुरेशा प्रमाणात साठा उपलब्ध आहे. औरंगाबाद परिमंडळामध्ये सन २०१९ ते २०२२ या तीन वर्षासाठी ९५ एजन्सीची नादुरूस्त वितरण रोहित्रे दुरुस्त करण्यासाठी नेमणूक करण्यात आली आहे.

सन २०२१-२२ मध्ये औरंगाबाद परिमंडळात एकुण २५२ किलो लिटर ऑईल उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. उपलब्ध करुन देण्यात आलेल्या ऑईल पैकी ५३ किलो लिटर ऑईलचा साठा दि. ०४.०३.२०२२ रोजी मध्यवर्ती भांडारामध्ये उपलब्ध आहे. ऑईलचा मुबलक साठा उपलब्ध असुन रोहीत्र दुरुस्तीसाठी ऑईलची कमतरता भासणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.

*******************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**मा. श्री. कैलास घाडगे पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यात शेतकऱ्यांनी चार वर्षापूर्वी वीज जोडणीकरिता डिमांड रक्कम भरुनही अद्याप वीज जोडणी झालेली नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये निदर्शनास येणे, महावितरण कंपनीकडून वीज जोडणी न झाल्यामुळे वीजेअभावी ज्वारीसह अन्य पिके पाण्याअभावी जागेवरच करपणे, वीज नसल्याने पाण्याचा उपसा होत नसल्याने पिकांना पाणी देता येत नसणे, नुकतेच तालुक्यातील सांगवी (काटी) येथील शेतकरी शिवारात ज्ञानेश्वर मगर यांची गट नंबर ७८० मधील सहा एकरातील ज्वारीचे पीक पाण्याअभावी जागेवरच करपल्याची घडलेली घटना, आधीच बहुतेक शेतकऱ्यांनी विहिर खोदण्याकरिता बँकेचे कर्ज घेतलेले असणे, कर्जफेडणीसाठी बॅकेकडून तगादा लावला जात असणे, असे असतांनाही हातातोंडाशी आलेली पिके पाण्याअभावी करपून जात असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडणे, शेतकऱ्यांकडे शेतीशिवाय उत्पन्नाचे दुसरे कोणतेही साधन नसल्यामुळे आत्मदहन करण्याशिवाय दुसरा पर्याय नसणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने सखोल चौकशी करुन तालुक्यातील वीज जोडणी तसेच जबाबदार असणाऱ्या महावितरण कंपनीविरुध्द तात्काळ कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा. मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

राज्यात दिनांक ०१.०४.२०१८ पूर्वी पैसे भरून प्रलंबित असलेल्या कृषीपंप अर्जदारांना उच्चदाब वितरण प्रणाली मधून वीज जाडण्या दिल्या जातात. दिनांक ०१.०४.२०१८ पासून पैसे भरून प्रलंबित असणाऱ्या कृषीपंप अर्जदारांना पारंपारिक पध्दतीने व सौरऊर्जाद्वारे वीज जोडणी देण्याकरिता शासनाने दि.१८.१२.२०२० रोजी "कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२०" जाहीर केले आहे.

"कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२०" अंतर्गत जमा झालेल्या 'कृषी आकस्मिक निधी' च्या ३३% रक्कम नविन जोडणी व विद्युत प्रणाली बळकटीकरण करण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर खर्च करण्यात येत आहे. विभागीय कार्यालयाद्वारे उपविभागीय स्तरावरील कृषीपंपांच्या जेष्ठता यादीप्रमाणे कृषीपंपाचे कामे करण्यात येत आहे. याकरीता 'कृषी आकस्मिक निधी' व जिल्हा नियोजन समिती अंतर्गत प्राप्त निधीतुन वीज पुरवठा देण्याची प्रक्रिया सुरु आहे. लघुदाब वाहिनीपासून २०० मीटर पेक्षा जास्त व उच्चदाब वाहिनींपासून ६०० मीटरच्या आत अंतर असलेल्या ग्राहकांना उच्चदाब वितरण प्रणाली द्वारे वीज जोडण्या देणे नियोजित आहे. उच्चदाब वाहिनी पासून ६०० मीटर पेक्षा जास्त अंतर असलेल्या कृषीपंपांना सौर उर्जेद्वारे वीज जोडण्या देण्याचे निर्धारीत आहे व हे काम महाऊर्जा मार्फत करण्यात येत आहे.

राज्यामध्ये दि. ०१.०४.२०१८ पूर्वी उच्चदाब वितरण प्रणाली अंतर्गत पैसे भरुन प्रलंबित असलेल्या १,४७,३५६ अर्जदारांपैकी १,२९,५४६ अर्जदारांना दि.२८.०२.२०२२ अखेर वीज जोडण्या दिल्या असून १७,८१० कृषीपंपाच्या वीज जोडण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच जिल्हा नियोजन व विकास मंडळ (डी.पी.डी.सी.) तसेच ग्राहकाधिष्ठित वितरण सुविधा (डी.डी.एफ) योजनेअंतर्गत ८४,३१२ अर्जदारांपैकी ७५,८७६ अर्जदारांना वीज जोडण्या

[कृ.प.त.प.

दिल्या असून ८,४३६ कृषीपंपाच्या वीज जोडण्याचे काम प्रगतीपथावर आहे. मुख्यमंत्री कृषीपंप योजना अंतर्गत ९९,९५६ पैसे भरुन प्रलंबित असलेल्या अर्जदारांपैकी ९९,५८८ अर्जदारांना वीज जोडण्या दिल्या असून उर्वरित ३६८ कृषीपंपाच्या वीज जोडण्याचे काम प्रगतीपथावर आहे व "कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२०" अंतर्गत जिल्हा नियोजन समिती योजनेअंतर्गत एकूण १,०२,०५० कृषीपंप वीज जोडण्या देण्यात आल्या आहे. उर्वरित १,२७,९०९ अर्जदारांना कृषीपंप वीज जोडण्या देण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

तुळजापूर तालुक्यामध्ये दि. ०१.०४.२०१८ पूर्वी उच्चदाब वितरण प्रणाली अंतर्गत १,१५७ अर्ज पैसे भरुन प्रलंबित होते. त्यापैकी फेब्रुवारी २०२२ पर्यंत ८४२ वीज जोडण्या देण्यात आल्या असून ३१५ वीज जोडण्या देण्याचे काम प्रगतीपथावर आहे. "कृषीपंप वीज जोडणी धोरण २०२०" अंतर्गत दि.०१.०४.२०१८ नंतर माहे फेब्रुवारी २०२२ पर्यंत कृषीपंप वीज जोडणीसाठी पैसे भरुन प्रलंबित असलेल्या १,३१५ कृषीपंप ग्राहकांपैकी ३९२ कृषीपंपांना वीज जोडण्या देण्यात आल्या असुन त्यापैकी "कृषी आकस्मिक निधी" मधून ३८५ कृषीपंपांना व जिल्हानियोजन समितीच्या योजनांच्या निधीमधून ७ कृषीपंपांना वीज जोडण्या देण्यात आल्या आहे. माहे फेब्रुवारी २०२२ अखेर ९२३ कृषी पंपाचे अर्ज पैसे भरुन जोडणीसाठी प्रलंबित असून निधीच्या उपलब्धतेनुसार वीज जोडणी देण्याचे काम करण्यात येत आहे. पैसे भरुन प्रलंबित असलेल्या अर्जदारांपैकी कृषीपंपांचे अंतर अस्तित्वात असलेल्या लघुदाब वाहिनीपासून ०-२०० मीटर अंतर असलेल्या ४९३ कृषीपंप ग्राहकांना "कृषीपंप वीज जोडणी धोरण २०२०" (कृषी आकस्मिक निधी) व जिल्हास्तरीय योजनांमधून प्राप्त होणाऱ्या निधीमधून वीज जोडणी देण्यात येतील.

श्री. ज्ञानेश्वर विश्वंभर मगर रा. सांगवी (काटी) ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद यांनी शेती पंपाच्या नविन कनेक्शनसाठी महावितरणकडे दि. ०८.०५.२०१८ रोजी अर्ज केला होता. त्यासाठी त्यांनी दि.१६.०५.२०१८ रोजी कोटेशन भरले आहे. तुळजापूर विभागाअंतर्गत येणाऱ्या प्रलंबित कृषीपंप वीज जोडणी सेवा जेष्ठता यादीमध्ये ९११ ग्राहक असून श्री. ज्ञानेश्वर विश्वंभर मगर रा. सावंगी (काटी) यांचा क्रमांक ४२ आहे. श्री. ज्ञानेश्वर विश्वंभर मगर रा. सांगवी (काटी) यांच्या कृषीपंपाच्या वीज जोडणी करिता लघुदाब वाहिनीपासूनच अंतर सुमारे ५९० मीटर इतके असून उच्चदाब वाहिनीपासून अंतर ७२० मीटर इतके आहे. सदर काम "कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२०" मधील तरतुदी नुसार करण्यात येईल.

श्री. ज्ञानेश्वर विश्वंभर मगर यांनी कृषी वीजपंप जोडणी करीता दि. ०९.०२.२०२२ रोजी पत्राद्वारे जिल्हाधिकारी कार्यालय उस्मानाबाद यांना आत्मदहनाची नोटीस दिली होती. त्यास अनुसरुन कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या, विभागीय कार्यालय, तुळजापूर यांनी दि.२४.०२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी कार्यालय उस्मानाबाद व श्री. ज्ञानेश्वर विश्वंभर मगर यांना वरीलप्रमाणे सविस्तर उत्तर पाठविलेले आहे.

शेतकऱ्यांच्या कृषीपंपाचे वीज कनेक्शन कापण्याची जी मोहीम महावितरणने सुरू केली आहे त्या संदर्भात, दि.१५.०३.२०२२ रोजी विधानमंडळात केलेल्या निवेदनानुसार, वीजपुरवठा खंडीत केलेल्या कृषी ग्राहकांची वीजजोडणी पूर्ववत करण्याचा व शेतकऱ्यांच्या हातात पिक येईपर्यंत आगामी तीन महिने कृषी वीज ग्राहकांची वीज तोडणी तात्पुरत्या स्वरूपात थांबविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

*********************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**मा. श्री. सुनिल प्रभु, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"राज्यातील महावितरण अंतर्गत नियुक्त कंत्राटदार एजन्सींनी ग्राहकांच्या वीज मीटरचे चुकीचे रिडींग घेऊन शासकीय महसूलाचे आर्थिक नुकसान केल्याप्रकरणी पुणे औरंगाबाद, नांदेड, अकोला येथील सहा कंत्राटदार एजन्सीविरुद्ध दिनांक १५ फेब्रुवारी, २०२२ रोजी बडतर्फीची कारवाई करण्यात येणे, महावितरणने या कंत्राटदार एजन्सींनी केलेल्या मीटर रिडींगची पडताळणी केली असता चुकीचे रिडींग दाखवून महावितरणचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान केल्याचे निदर्शनास येणे, ग्राहकांच्या वीज मीटरचे अचूक रिडींग न घेणाऱ्या कंत्राटदार व एजन्सींना कायमस्वरुपी काळ्या यादीत टाकून त्यांचेवर कठोर कारवाई करण्याचा शासनाने इशारा देऊनही अद्याप त्यांचेवर फौजदारी व काळ्या यादीत टाकणेबाबत कोणतीच कारवाई करण्यात न येणे, तसेच या एजन्सींद्वारे रिडींग केलेल्या सर्व मीटरची फेरतपासणी करण्यासाठी शासनाने विशेष मोहिम राबवून कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावायची कार्यवाही व उपाययोजना."

## मा. मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

महावितरणच्या ग्राहकांचे मीटर वाचन करण्याकरीता उपविभागीय स्तरावर ई. निवेदेद्वारे कंत्राट देण्यात येते. सदर कंत्राटदारांनी मोबाईल ॲपद्वारे ग्राहकाच्या प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन मीटरचा फोटो व मीटरचे अचूक रीडींग घेणे अपेक्षीत असते. सांघिक कार्यालयाद्वारे तपासणी दरम्यान सदर कामात मीटर वाचन चुकीचे असणे, मीटरचा फोटो न घेणे किंवा अस्पष्ट असणे अशा स्वरुपाच्या त्रुटी आढळुन आल्या. सदर त्रुटीमुळे महावितरणच्या सहा उपविभागामध्ये रू. ९,५३,९०८/- रक्कमेचा महसूल प्रलंबित राहीला. सदर ग्राहकांची देयके प्रत्यक्ष वापराप्रमाणे दुरुस्त करण्यात येत आहेत.

महावितरणच्या महसुलला नुकसान होऊ नये व ग्राहकांना अचुक वाचनाचे देयक दिले जावे तसेच महावितरणच्या देयकाची विश्वासहर्ता वाढविण्याकारीता औरंगाबाद (शहर) मंडळातील गारखेड उपविभाग, नांदेड मंडळातील किनवट उपविभाग, वसई मंडळातील वसई रोड (शहर), अकोला मंडळातील अकोला (शहर), बारामती मंडळातील केडगाव व भोर उपविभाग या ६ उपविभागातील मीटर रीडींग एजन्सीचे कार्यादेश फेब्रुवारी २०२२ मध्ये रद्द करण्यात आले.

उपरोक्त सदर मीटर रीडींग एजन्सींना काळया यादीत टाकण्यासंबंधीची निविदेच्या अटी व शर्ती नुसार प्रक्रिया सुरू आहे.

अचुक मीटर रीडींग प्रमाणे वीज देयक देण्याकरीता राज्यातील सर्वच उपविभागामार्फत मीटर वाचन पडताळणी दैनंदिनरीत्या करण्यात येत आहे. तसेच ग्राहकाकडून चुकीचे रिडींगबाबत तक्रार आल्यास महावितरण मार्फत प्रत्यक्ष रिडींग घेवून चुकीची बीले त्वरीत दुरूस्त करून देण्यात येतात. तसेच सांघिक कार्यालयामध्ये एक स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला असुन सर्वच मीटर वाचन कंत्राटदारांच्या कामावर देखरेख करण्यात येत आहे. सदर कामात त्रुटी आढळल्यास कंत्राटदारांना दंड, कंत्राट रद्द करणे, काळया यादीत टाकणे इत्यादी प्रकारच्या कारवाई करण्यात येत आहेत.

रोटा/एच ०११६ [८००-५-२०२२]************************

D/Urja-५/मार्च- २०२२/लक्षवेधी सूचना

(८)

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

मा. श्री. राम सातपुते, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"माळशिरस तालुक्यात (जि. सोलापूर) महावितरण कंपनीच्या पोलला सिमेंट कॉक्रीट नसल्याने पोल पडणे, तारा तुटणे, तुटलेल्या तारांचे फ्युज न जाता तारा तशाच वीजभारीत राहिल्याने धाको होणे, फ्युज ऐवजी अल्युमिनियम तारांचे पंथे वापरणे, ट्रन्सफार्मर सेंटरला न्यूट्रलळा आर्थिंग नसणे, इ. दोष सर्रास सर्वत्र दिसून येणे, सदर सदोष वीजरचना करणारे महावितरणचे अधिकारी, विद्युत ठेकेदार व विद्युत निरिक्षक यांचेवर शासनाने अद्याप कोणतीच कारवाई केलेली नसणे, राज्यात समान पध्दतीने वीजरचना/उभारणी व्हावी यासाठी बांधकाम पध्दती व नकाशे शासनाने निश्चित केलेले नसणे, सोलापूर जिल्ह्याच्या विद्युत निरिक्षकाकडे सोलापूर व कोल्हापूर असे दोन जिल्हे, दोन विदयुत निरिक्षक व एक सहाय्यक विद्युत निरिक्षक असे एकुण तीन चार्ज देण्यात येणे, सदर विद्युत निरिक्षक हे प्रत्यक्ष घटनास्थळी भेटी देतात की नाही याचा अहवाल शासनाने सादर करणे गरजेचे असणे, त्याचबरोबर महावितरणच्या ३३/११ के.व्ही. उपकेंद्राची वार्षिक तपासणी विद्युत निरिक्षक यांचेकडून होते काय असा प्रश्न निर्माण होणे, महाराष्ट्र राज्य हे प्रगत राज्य असल्याने महावितरण हे टेस्टिंग शाखा, दक्षता शाखा, गुणनियंत्रण शाखा व कार्यालयाचे विस्तृत जाळे असल्याने व विद्युत निरिक्षकांचे निरिक्षण घटनास्थळी जाऊन होत नसणे, राज्य शासनाने पुर्वीप्रमाणे नोटिफाईड व्होल्टेज ३३ के व्ही. जाहिर करुन २६.५.२०१५ च्या शासन निर्णयाप्रमाणे स्वयंप्रमाणितता व व्यवसाय सुलभता यांची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, तसेच गेल्या तीन वर्षात २०० हेक्टरच्या वरती ऊस व डाळींबाच्या पिक जळीत होऊन शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणावर नुकसान झालेले असतानाही शासनाकडून अद्यापपर्यंत शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत दिलेली नसणे, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासन उदसिन असल्याचे दिसून येणे, यामुळे शेतकऱ्यांमध्ये शासनाप्रती चिडेची भावना निर्माण झालेली असणे, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

## मा. मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

महावितरण कंपनीच्या राज्यभरातील कार्यक्षेत्रातील पायाभूत सुविधा उभारणीत आवश्यक असणाऱ्या उच्चदाब लोखंडी व सिमेंट पोलला तसेच स्टे याना आवश्यकतेनुसार सिमेंट कॉंक्रिट करण्यात येते व असे करताना भौगोलिक परिस्थिती, हवेचा दाब (विंड प्रेशर), वाहिनीचे वोल्टेज, प्रकार इ. विचारात घेऊन निर्धारित केलेल्या कॉस्ट डेटानुसार केली जाते. परंतु, नैसर्गिक आपत्ती जसे की, वादळ, जोराचा वारा, अतिवृष्टी, पर्जन्यमान नदी पात्रातून वाजवीपेक्षा जास्त दाबाने वाहणारे पाणी यामुळे जमीन खचून पोल तुटणे, तारा तुटणे व तुटलेल्या तारांचे फ्युज न जाता वीज वाहक तारा जमिनीवर न पडता झाडाच्या फांदीवर व पाण्यावर पडल्यामुळे काही वेळा फ्युज न जाण्याच्या घटना घडतात. त्याकरीता योग्य क्षमतेचे फ्युज वायर वापरण्याबाबत व फ्युज ऐवजी अल्युमिनियम तारांचे पंथे न वापरण्याबाबत क्षेत्रिय कार्यालयांना वेळीच निर्देशित केलेले आहे. महावितरणकडून उभारणी केलेल्या प्रत्येक रोहीत्रास महावितरणला मंजूर असलेल्या मेथड ऑफ कन्स्ट्रक्शन (उभारणी पध्दती) नुसार न्युट्रलला जी. आय. वायरने व्यवस्थित अर्थिंग केले जाते. तसेच सर्व विद्युत रोहीत्राचे फ्युज योग्य क्षमतेच्या फ्युज वायरने महावितरण कंपनीद्वारे बसविले जातात. सदोष वीज रचना करणारे महावितरणचे अधिकारी, विदयुत ठेकेदार हे दोषी आढळल्यास नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येते. राज्यात समान पध्दतीने वीज रचना / उभारणी व्हावी याकरीता बांधकाम पध्दती व नकाशे तसेच नवीन उभारणी केलेल्या वाहिनी, रोहीत्र व लघुदाब वाहिनी इ. ची उभारणी ही मंजूर

रोटा/एच १३५ [८००-५-२०२२]-१ [कृ.मा.प.

असलेल्या मेथड ऑफ कन्स्ट्रक्शन (उभारणी पध्दती) नुसार व मंजूर नकाशाप्रमाणेच होते व उभारणी नंतर महावितरणच्या यंत्रणेकडून व थर्ड पार्टी जसे आर.ई.सी. या संस्थेद्वारे ही गुणवत्तेची व सुरक्षिततेची पाहणी करुन त्यामधील दोष काढले जातात. वीज संच मांडणीची रचना/उभारणी समान पद्धतीने व्हावी याकरीता, केंद्रीय विद्युत प्राधिकरण (सुरक्षा व पुरवठा संबंधीचे उपाययोजना) विनियम, २०१० मधील तरतुदींचे पालन या विभागाकडून करण्यात येते. अशा रीतीने संपूर्ण तांत्रिक बाबींची पाहणी करुन सुरक्षिततेचे सर्व नियम पाळूनच महावितरणने उभारणी केलेली पायभूत सुविधा आवश्यकतेनुसार विदयुत निरीक्षक कार्यालयाची परवानगी घेऊन कार्यान्वित केली जाते.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. ११.०७.२०१९ च्या अधिसूचनेन्वये केंद्रीय विदयुत प्राधिकरणाच्या विनियम-३० आणि ४३ च्या प्रयोजनासाठी ११ के.व्ही. हे नोटिफाईड व्होल्टेज म्हणून अधिसूचित केले आहे. या नोटिफाईड व्होल्टेज वरील प्रत्येक विदयुत संच मांडणीचे निरीक्षण व चाचणी विदयुत निरीक्षकाकडून करण्याबाबत सदर अधिनियमातील व विनियमातील तरतूदीनुसार अधिसूचित केले आहे. त्याप्रमाणे ११ के.व्ही. पर्यंत असलेल्या विदयुत संच मांडणीचे निरीक्षण, चाचणी व स्वयंप्रमाणितता ही मालक, महावितरण किंवा ग्राहक यांचेकडून करण्यात येते. तसेच, नोटिफाईड व्होल्टेज ३३ के.व्ही. वरील प्रत्येक विदयुतसंच मांडणीचे निरीक्षण व चाचणी विदयुत निरीक्षकाकडून करण्यात येते.

प्रशासकीय कामे सुरळीतपणे आणि सुलभतेने व्हावी या करीता उपलब्ध विद्युत निरीक्षकांची संख्या विचारात घेता सद्यस्थितीत सहाय्यक विद्युत निरीक्षक ,सोलापूर यांचेकडे विद्युत निरीक्षक, सोलापूर आणि विद्युत निरीक्षक, कोल्हापूर या दोन पदांचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. या कार्यालयास सूचना प्राप्त झाल्यानंतर अपघातांची चौकशी, विद्युत संचमांडणीची निरीक्षणे प्रत्यक्ष स्थळी भेट देऊनच केली जातात आणि तसा अहवाल देखील सादर केला जातो.

अपघातांच्या चौकशी दरम्यान विद्युत त्रुटी आढळून आल्यास संबंधित महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना याबाबत विद्युत निरीक्षकांमार्फत ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते आणि त्यांचे कडून सदर त्रुटींची पूर्तता करून घेण्यात येते. माळशिरस तालुक्यात महावितरणची ३३/११ के.व्ही. ची एकूण ३० उपकेंद्रे असून त्यापैकी १७ उपकेंद्राची निरीक्षणे करण्यात आली असून, उर्वरित १३ उपकेंद्राची निरीक्षणे मार्च अखेर पर्यंत करण्यात येणार आहेत. माळशिरस तालुक्यात मागील वर्षात आढळलेल्या विद्युत त्रुटीबाबत १६ प्रकरणी ज्ञापन देण्यात आले आहेत.

मागील तीन वर्षात ऊस व डाळिंबाच्या पिक जळीताची एकूण ६३ प्रकरणे घडली असून, त्यापैकी ४३ प्रकरणे महावितरणचे सदोष वीज संचमांडणीमुळे घडल्याचे चौकशी अंती निष्पन्न झाले आहे. सदर ४३ प्रकरणी नुकसान भरपाई अदा करणे बाबत विद्युत निरीक्षक कार्यालयाने महावितरणला कळविले आहे.

माळशिरस तालुक्यातील अकलूज विभागामध्ये मागील तीन वर्षात एकूण ८० हेक्टर वरील ऊस डाळीबांचे पीक जळीताची एकूण ३८ प्रकरणे घडली. त्यापैकी २९ प्रकरणामध्ये विदयुत निरीक्षकाचा अहवाल प्राप्त झाला असून २२ प्रकरणी महावितरण जबाबदार असल्याचे अहवालात नमूद केले आहे. सदरील अपघातापैकी १३ प्रकरणी अर्ज अप्राप्त असून ८ प्रकरणी कागदपत्रांची पूर्तता करण्याबाबत संबंधितास कळविण्यात आलेले असून एका प्रकरणात नुकसान भरपाई अदा केलेली आहे.

तसेच शासनाचे व्यवसाय सुलभता धोरण अंमलात आणण्याच्या दृष्टीने या विभागाच्या एकूण १० सेवा ऑनलाईन पध्दतीने सर्वसामान्य जनतेस पुरविण्यात येत असून त्यातील सात सेवा लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ (Right to service Act २०१५) अंतर्गत अधिसूचित करण्यात आल्या आहेत. स्वयंप्रमाणीकरणा करीता केंद्रिय विद्युत प्राधिकरण (सुरक्षा व विद्युत पुरवठा या संबंधीचे उपाय योजना) विनियम-२०१० च्या विनियम ५ (अ) नुसार या विभागामार्फत सनदी विद्युत सुरक्षा अभियंता यांची परीक्षा घेऊन सनदी विद्युत सुरक्षा अभियंता यांना प्राधिकृत करण्यात वा नेमणूक करण्यात येत आहे.

महावितरणच्या अस्तित्वात असणाऱ्या प्रणालीचे अपघात घडू नये म्हणून नियमितपणे सर्वेक्षण केले जाते. सदर सर्वेक्षणात अपघात घडू शकेल अशा बाबी आढळून आल्यास त्या ठिकाणी तातडीची उपाययोजना करुन प्रणालीची निगा व देखभाल दुरुस्तीची कामे (Preventive Maintenance) तातडीने करण्यात येतात.

एच १३५—१३अ

************************

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

विधानसभा लक्षवेधी क्र.१५२०

श्री. ज्ञानराज चौगुले, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१५२० पुढीलप्रमाणे आहे :-

"नाशिक महापालिकेच्या तसेच खासगी शाळांतील विद्यार्थ्यांना निकृष्ट आहार पुरवल्या प्रकरणी दोन वर्षापूर्वी सेंट्रल किचन योजनेच्या १३ ठेकेदारांना निकृष्ट आहार पुरवठा केल्याप्रकरणी अपात्र करणे, आता यापैकी एका ठेकेदाराच्या हिरावाडीतील ठाकरेमळा परिसरातील स्वामी विवेकानंद बचत गटाच्या गोदाम तपासणीत शेजारील बंगल्यात शासनामार्फत पुरविण्यात आलेली तांदळाची २८१ (१५ हजार किलो) पोती सापडून यामध्ये कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला असणे, सदरहू तांदूळ साठ्याचा वापर केला असता तर एका दिवसात सुमारे १ लाख १२ हजार विद्यार्थ्यांची खिचडीव्दारे भुक भागण्याची शक्यता असणे, स्वामी विवेकानंद बचतगटाने शासनाचा तांदुळसाठा संपवून उलट आपणच आपल्याकडील १० हजार किलो तांदुळ स्वत: आणून खिचडी शिजवल्याचा दावा करीत शिक्षण विभागाची फसवणूक करण्यात येणे, विशेष म्हणजे महापालिका आयुक्तांनी याआधी १३ ठेकेदारांचे (५० टक्के बिल) २ कोटी ६९ लाख रुपयांचे स्थगित ठेवलेले बिल देण्यासाठी शासनातील उच्च पदस्थ व लोकप्रतिनिधींकडून बैठक घेऊन अदा करणेबाबत आयुक्तांवर दबाव टाकून आदेशित करण्यात येणे, सापडलेल्या २८१ पोती प्रकरणी चौकशी करुन महापालिकेला सादर केलेल्या अहवालात गोदामात तांदुळ राहिले नसल्याचे नमूद करण्यात येणे, यामुळे शेजारील बंगल्यात ३०० पेक्षा अधिक शासनाचे शिक्के असलेली २८१ पोती कशी आली याचे उत्तर देण्यास हेतुपूर्वक टाळण्यात येणे, यामुळे महापालिक आयुक्तांना सादर झालेला अहवाल हा संबंधीत अधिकारी व ठेकेदार संस्थेला बेकायदा संरक्षण देणारा असल्याने अहवालाबाबत निर्माण झालेले संशयाचे वातावरण, सन २००३ पर्यंत पोषण आहार पुरवठा करणाऱ्या महिला बचत गटाकडून काढून पालिका प्रशासनाने सेंट्रल किचनच्या गोंडस नावाखाली १३ ठेकेदार संस्थांना देण्यात येणे, परिणामी महिला बचत गटावर ओढवलेले बेराजगारीचे व उपासमारीचे संकट, त्यानंतर १३ ठेकेदार संस्थांनी केलेला गैरप्रकार उघडकीस आल्यानंतर महिला बचत गटांना पुन्हा पोषण आहार पुरविण्याचे काम देण्याचा निर्णय घेऊन

यासाठी निविदा काढण्यात येणे, त्यासाठी ४ ते १८ फेब्रुवारी पर्यंत मुदत देण्यात आली असताना अचानक निविदा प्रक्रियेवर स्थगिती घेऊन अपात्र १३ ठेकेदारांपैकी एका ठेकेदार संस्थेला काम दिल्याचा घडलेला आश्चर्यजनक प्रकार, सदरहू प्रकरणात कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार होऊन शासकीय निधीचा झालेला अपव्यय तसेच विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या पोषण आहारावर त्याचा गंभीर परिणाम होणे, दरम्यान ह्या प्रकरणातील ठेकेदार ऋषिकेश चौधरी यांनी सदर लपवलेला तांदुळ हा शासनाचा असल्याचे स्वतःहून मान्य केले असणे, सदरहू प्रकरणाची शासनाने उच्च स्तरावरुन एसआयटीव्दारे चौकशी करुन महापालिकेतील संबंधीत दोषी अधिकारी, ठेकेदार यांचेवर कठोर कारवाई करुन, पोषण आहार वितरणाचे काम गरीब गरजू महिला बचत गटांना देणेबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य जाणीवपूर्वक दुर्लक्ष, परिणामी विद्यार्थी व महिला बचत गटांमध्ये निर्माण झालेले तीव्र संतापाचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## निवेदन

(प्रा. वर्षा गायकवाड, शालेय शिक्षण मंत्री)

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत नाशिक महानगरपालिकेमार्फत नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील शाळांना केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीमार्फत तयार आहाराचा पुरवठा करण्यासाठी १३ संस्थांची निवड केली होती. तथापि, आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी सदर संस्थांनी करारनाम्यातील अटी व शर्तींचा भंग केल्यामुळे प्रस्तुत संस्थासोबत केलेला करारनामा मार्च, २०२० मध्ये संपुष्टात आणला आहे. याबाबत शासनस्तरावर सुनावणी आयोजित करुन प्रस्तुत प्रकरणी शिक्षण संचालक (प्राथ.) यांनी स्थळपाहणी अहवाल सादर करेपर्यंत तात्पुरती स्थगिती दिली होती.

शिक्षण संचालक (प्राथ.), यांच्या अध्यक्षतेखालील समितीतील सदस्यांनी सदर १३ संस्थापैकी असलेल्या स्वामी विवेकानंद महिला स्वयंसहायता बचत गट, ता. निफाड, जि. नाशिक या संस्थेच्या स्वयंपाकगृहास दि.२४ फेब्रुवारी, २०२२ रोजी भेट दिली असता त्यांच्याकडे एकूण १४,०५०/- किलोग्रॅम तांदूळ अवैधरित्या आढळून आला आहे. सदर अवैध तांदूळ साठ्याच्या अनुषंगाने संबंधित संस्थेकडून शासकीय दराने वसुली करणे, संबंधित संस्थेचा करारनामा / कार्यारंभ आदेश रद्द करणे, संबंधित संस्थेस अन्न शिजवून पुरवठा करणेबाबत अथवा तत्सम

प्रकारचे कोणतेही कामकाज यापुढे देण्यात येवू नये तसेच, संबंधित संस्थेची अनामत रक्कम व इतर जमा असलेल्या सर्व प्रकारच्या रकमा शासन दरबारी जप्त करण्यात येणे याप्रमाणे कारवाई प्रस्तावित आहे.

शिक्षण संचालक (प्राथ.) यांनी संबंधित १३ संस्थाबाबतचा स्थळपाहणी अहवाल शासनास सादर केला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने यापूर्वी निवड करण्यात आलेल्या १३ संस्थांचे करारनामा रद्द करण्याबाबत आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांचा निर्णय कायम ठेवलेला आहे व नव्याने संस्थांची निवड करण्याची प्रक्रिया राबविणे प्रस्तावित आहे.

**********

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये लक्षवेधी सूचना

ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री. किसन कथोरे, प्रशांत ठाकूर, सुनील राणे, सुनिल प्रभू, रणधीर सावरकर, श्रीनिवास वनगा, संतोष दानवे, मंगेश चव्हाण, अबु आजमी, राहूल कुल, जयकुमार गोरे, रईस शेख, श्रीमती यामिनी जाधव, वि.स.स यांनी म.वि.स. नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"प्राथमिक शिक्षण संचालनालयाने जाहिर केलेल्या यादीद्वारे शासन मान्यता न घेता राज्यात ६७४ शाळा या बेकायदेशीरपणे सुरु असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात उघडकीस येणे, सदर शाळांमध्ये मुंबई महानगरपालिका विभागात सर्वाधिक म्हणजे २२३ शाळा, त्यानंतर ठाण्यात १४९ तर पालघरमध्ये १४३ शाळा मान्यते अभावी सुरु असल्याचे समोर येणे, प्राथमिक शिक्षण संचालनालयाने नोव्हेंबर, २०२० मध्ये जारी केलेल्या परिपत्रकानुसार शालेय शिक्षण विभागाच्या मान्यता प्रमाणपत्राशिवाय शाळा उघडल्यास किंवा शिक्षण विभागाने मान्यता काढून घेतल्यानंतरही शाळा सुरु ठेवल्यास अशा संस्था चालकांविरोधात त्वरीत कारवाई करण्याच्या सूचना राज्यातील सर्व नगरपालिका, नगरपरिषद आणि महानगरपालिका शिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या असणे, मुंबईत अनेक खासगी प्राथमिक शाळा वर्षानुवर्षे आरटीई नियमानुसार कोणतीही मान्यता न घेता बिनदिक्कत सुरु असल्याचे निदर्शनास येणे, या बेकायदेशीर शाळांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात येण्याची भीतीही व्यक्त होणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, प्राथमिक शिक्षण संचालनालयाने नोव्हेंबर, २०२० मध्ये जारी केलेल्या परिपत्रकानुषंगाने राज्यातील सुरु असलेल्या ६७४ बेकायदेशीर शाळांविरोधात शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया ."

*****************************************************************************************************

<u>प्रा.वर्षा गायकवाड, मंत्री (शालेय शिक्षण) यांचे निवेदन</u>

यु-डाईस (U-DISE) प्रणालीवरील माहितीनुसार राज्यात ६७४ शाळा अनधिकृत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामध्ये मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील २३९ शाळा, ठाणे जिल्ह्यातील १४९ शाळा व पालघर जिल्ह्यातील १४३ शाळांचा समावेश आहे. सदर शाळांपैकी ज्या शाळा शासन मान्यतेशिवाय सुरु आहेत अशा शाळांविरूद्ध बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ च्या कलम १८ (५) मधील तरतुदींनुसार तसेच, दि.१९/०६/२०१० व दि. १०/११/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्याबाबत प्राथमिक शिक्षण संचालनालयामार्फत सर्व क्षेत्रिय कार्यालयास कळविण्यात आले आहे. सदर अनधिकृत शाळांमधील विद्यार्थ्यांचे नजीकच्या शासन मान्यता प्राप्त शाळा किंवा स्थानिक प्राधिकरणांच्या शाळांमध्ये समायोजन करण्यात येत असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचा प्रश्न उद्भवत नाही.

*****

महाराष्ट्र विधानसभा सन २०२२ चे पहीले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्रमांक- १४९

सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. राम कदम, रवि राणा, अभिमन्यु पवार, डॉ. संदीप धुर्वे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक- १४९ पुढीलप्रमाणे आहे :-

" मावळ तालुक्यातील मळवंडी ठुले प्रकल्पासाठी १९९७ मध्ये १२९ शेतकऱ्यांच्या जमिनी शासनाने संपादित केल्याने त्यांचे पुनर्वसनाच्या घेतलेल्या निर्णयास २५ वर्षानंतरही पर्यायी जमीन भूखंड वाटप प्रलंबित असणे, दि.०५/१२/२०१७, १६/०२/२०१९ शासन आदेशानुसार मळवंडी प्रकल्पग्रस्तांच्या पात्रतेनुसार मौजे डिंग्रजवाड़ी ता. शिरूर २३९ गटामध्ये अनुज्ञेय होणारी पूर्ण देय जमीन वाटप न करता अंशतः वाटप करणे, धरणग्रस्तांचे संपादित जमिनीचे बंदी दिनांकापूर्वीचे ८अ खात्यांनुसार त्यांना जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जमीन वाटप संकलनांनुसार पात्र ठरविलेली देय जमीन वाटप न करणे, विद्यमान पुनर्वसन अधिकाऱ्याने आदेशात निश्चित केलेल्या कुटुंबसंख्येनुसार देय जमीन वाटप न करणे, शासनाच्या दि.१३/०५/२०१९ आदेशाविरोधात जमीन ताब्यात देण्यापूर्वीच कब्जेहक्काची रक्कम वसूल करणे, ताबा दिला नसणे, जमिनीस सिंचनाची व रस्त्याची सोय केलेली नसणे, ताबा दिल्यानंतर पुढील समान वार्षिक हप्त्याने रक्कम वसूल न करणे, प्रशासन अतिक्रमणधारकांवर पुनर्वसन अधिनिमातील कलम २१ पोटकलम (१ ते ५) नुसार जमीनवाटप दिनांकापासून प्रतिदिवस १००० रु. प्रमाणे दंडात्मक वसुलीची कार्यवाही न केल्याने शासनाचा कोट्यवधीचा महसुल बुडवणे, उत्खनन झाले नसलेला खोटा अहवाल देणे, पोलिसांनी अद्यापही २७ व्यक्तींवर गुन्हे दाखल न करणे, सदर प्रकल्पग्रस्तांच्या संरक्षणाच्या उपाययोजना व प्रलंबित न्याय देणेकामी दिरंगाईबाबत शासनाकडून गुन्हे दाखल झालेले नसणे, त्याअनुषंगाने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे निवेदन

पुणे जिल्हयातील मावळ तालुक्यातील मळवंडी ठुले प्रकल्पासाठी मौजे. मळवंडी, कोथुर्णे, तिकोणा, वारु या एकुण चार गावंमधून एकुण १११ भूधारकाचे एकुण ८३ हे. ५२ आर क्षेत्र संपादित करण्यात आलेले आहे. एकूण प्रकल्पग्रस्तापैकी फक्त ४ प्रकल्पग्रस्तांनी विहीत मुदतीत ६५% रक्कम भरली असल्याने ते प्रकल्पग्रस्त पर्यायी जमीन वाटपास पात्र आहेत, उर्वरित प्रकल्पग्रस्त महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९८६ चे १६(२) नुसार अपात्र ठरतात.

मळवंडी ठुले प्रकल्पाचे लाभक्षेत्रात महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९८६ मधील कलम ११(१) च्या दिनांक ३०/०९/१९९९ च्या अधिसूचनेन्वये मावळ तालुक्यातील मौजे. कोथुर्णे, तिकोणे, मळवंडी, ब्राम्हणोली या गावांमध्ये लाभक्षेत्र जाहिर केले होते. परंतू या गावांमध्ये क्षेत्र संपादन होऊ शकले नाही. त्यानुसार मळवंडी ठुले प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये पर्यायी जमीन वाटपासाठी संपादन क्षेत्र उपलब्ध नसल्यामुळे सदर प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना खेड तालुक्यातील मौजे. काळूस या गावातील जमीन वाटप करणेबाबत शासनाचे पत्र दिनांक ११/०४/२०१७ अन्वये मान्यता देण्यात आलेली होती. परंतू प्रकल्पग्रस्त यांनी सदरची जमीन नाकारून मा. उपलोकायुक्त यांच्याकडे तक्रार केली होती.

त्या अनुषंगाने शासनास फेरप्रस्ताव सादर करणेत आला होता या प्रस्तावानुसार शासनाचे पत्र दिनांक ०५/१२/२०१७ अन्वये मळवंडी ठुले प्रकल्पग्रस्तांना त्याची पात्रता तपासून पात्र प्रकल्पग्रस्तांना मौजे, डिंग्रजवाडी ता. शिरुर जि. पुणे येथील गट.नं. २३९ मधील अनुज्ञेय असलेले क्षेत्र वाटप करण्यास शासन मान्यता देण्यात आली. त्यानुसार मळवंडी ठुले या प्रकल्पग्रस्तांची पात्रता तपासून पात्र प्रकल्पग्रस्तांना खालीलप्रमाणे देय जमीन वाटप करण्यात आली आहे.

| पात्र प्रकल्पग्रस्त | अवॉर्ड नुसार संपादित जमीन | एकुण अनुदेय क्षेत्र | देण्यात आलेले क्षेत्र |
|---|---|---|---|
| श्री. नामू दामू ठुले तर्फे म.वा मारुती दामू ठुले तर्फे वारस रामदास मारुती ठुले व इतर | १ हे. ८४ आर (पैकी ० हे ६४ आर या क्षेत्राची ६५ टक्के रक्कम कपात केल्याची कागदपत्रे सादर केलेली नाहीत) | १ हे. २०. आर | १ हे. २०. आर |
| श्री. अनंता लक्ष्मण ठुले व इतर | २ हे. ९२.६ आर | १ हे. ६० आर | १ हे. ६० आर |
| श्री. नामदेव थारु उदेकर व इतर | १ हे. २३ आर | १. हे.६० आर | १. हे.६० आर |
| श्री. रघुनाथ राघु ठुले व इतर | १. ६ ५.५ आर | ८० आर | ००. हे ८० आर |

तसेच मळवंडी ठुले प्रकल्पामुळे गावठाण बाधित नाही. त्यामुळे भूखंड वाटपाचा प्रश्नच उद्भवत नाही. तसेच कुटुंबसंख्येनुसार प्रकल्पग्रस्त यांची कुटुंबसंख्या पात्र केली होती परंतू " महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९८६ भाग तीन व चार च्या प्रयोजनार्थ, कुटूंब म्हणजे बाधित व्यक्तीचा विवाहसाथी, मुलगे, अविवाहित मुली किंवा बहीण, आई व वडील; मात्र सर्व व्यक्ती तिच्याकडे राहणा-या व तीच्यावर अवलंबून असल्या पाहिजेत." असे कुटुंबसंख्याच्या व्याख्येमध्ये नमुद केले आहे. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९८६ मधील भाग ३ नुसार प्रकल्पबाधित व्यक्तींच्या कुटुंबातील व्यक्तींची संख्या पाचाहून अधिक असेल त्याबाबतीत, २ हेक्टर्स व ८० आर क्षेत्राच्या कमालमर्यादेस राहून प्रत्येक तीन ज्यादा व्यक्तींसाठी ४० आर इतकी ज्यादा जमीन देणेबाबत नमूद केले आहे. त्याप्रमाणे वरील प्रकल्पग्रस्त हे सादर केलेल्या पुराव्याच्या कागदपत्रांची तपासणी करता कुटुंबसंख्येनुसार अधिकची जमीन मिळणेस पात्र नाहीत असे दिसून आले. त्याबाबत संबंधित प्रकल्पग्रस्ता तर्फे ॲड. रामदास ठुले यांनी नव्याने कागदगपत्रे सादर करण्याकरिता थोडा अवधी मिळावा अशी विनंती केली. त्यांच्या विनंतीनुसार त्यांनी कागदपत्रे सादर केलेनंतर त्यावर महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९८६ मधीन तरतुदीनुसार कार्यवाही करण्याची दक्षता घेत आहोत.

सदर वाटप करण्यात आलेला गट हा शासकीय गायरान आहे. हा सरकारी गायरान असलेने त्यास महाराष्ट्र जमीन महसुल (सरकारी जमीनींची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ मधील सर्व तरतुदी लागु होत आहे. त्यानुसार दुय्यम निबंधक शिरुर यांचेकडीन जा.क्र. ६०/१८ दिनांक २५/०१/२०१८ मुल्यांकन दाखल्यानुसार सन २०१७-२०१८ चे गायरान मुल्यांकन प्रतिहेक्टर दर रुपये २४,५०,०००/- आहे. त्यानुसार प्रकल्पग्रस्त यांना त्याप्रमाणे होणारी कब्जेहक्काची रक्कम भरणा करणे बाबत कळविण्यात आले होते. परंतू संबंधितांनी सदरची रक्कम न भरल्यामुळे जमीनीचा ताबा देण्याची कार्यवाही करता आली नाही. तसेच अर्जदार यांच्या विनंतीनुसार सदर कब्जेहक्काच्या रक्कमेचे

सोईनुसार सुलभ हप्त्यात भरणा करणेबाबत विनंती केली होती. त्यानुसार प्रकल्पग्रस्त यांना कब्जेहक्काची रक्कम भरणेकामी ६ हप्ते करुन देण्यात आलेले आहेत.

त्यानुसार प्रकल्पग्रस्तांनी फक्त पहिल्या हप्त्याचीच रक्कम भरणा केली असून उर्वरित ५ हप्त्यांची रक्कम भरणा करणे बाकी आहेत. सदरच्या प्रकल्पग्रस्तांना जमीनीचा ताबा दिनांक ११/०३/२०२२ रोजी मंडळ अधिकारी कोरेगाव भिमा ता. शिरुर यांनी समक्ष दिला असल्याने त्यानुसार पुढील ५ हप्त्यांची रक्कम भरणा करुन घेण्यात येईल.

मौजे. डिंग्रजवाडी ता. शिरुर गट क्र. २३९ हा गायरान जमीनीचा गट असल्याने सदर जमीनीवर मोठ्या प्रमाणावर शेतीकरिता अतिक्रमण झाले असल्याने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ संहिता खंड- १ मधील कलम- ५० नुसार शासनाने निहीत असलेल्या जमीनीवरील अतिक्रमण दूर करणे शास्ती व इतर अनुषंगिक बाबीबाबत तरतूदी असून त्यानुसार एखादी व्यक्ती शासकीय जमीनीचा अनाधिकृत भोगवटा शेतीकारणाकरिता वापर करित असेल तर दंडाची आकारणी करणे बाबत नमूद आहे. त्यानुसार तहसिल कार्यालय शिरुर यांचेकडून आदेश पारित करण्यात आले आहेत.

प्रकल्पग्रस्तांना देय जमीनीच्या वाटप आदेशाच्या अनुषंगाने संबंधित प्रकल्पग्रस्त यांना ताबा देणेसाठी दिनांक ०८/१२/२०२० ही तारीख ठेवण्यात आली होती. परंतू ग्रामस्थांनी विरोध केल्याने ताब्याची पुढील तारीख १८/१२/२०२० नेमण्यात आली. सदरच्या दिवशी जमीनीमध्ये मोठया प्रमाणात अतिक्रमण आढळून आले. तेथे ऊस, बटाटा इ. पिके घेत असल्याचे आढळून आले तसेच स्थानिक लोकांनी जमीन मोजणीसाठी व ताबा देणेचे कामकाज करणेसाठी विरोध केला. त्या अनुषंगाने मंडळ अधिकारी कोरेगाव भिमा ता. शिरुर यांनी दिनांक २४/१२/२०२० पोलिस निरीक्षक, तळेगाव ढमढेरे, शिक्रापुर ता. शिरुर यांना गुन्हे नोंद करणेकामी पत्र दिले होते. संबंधित प्रकल्पग्रस्त यांना ताबा देण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी पुणे यांच्या कार्यालयामार्फत अपर पोलिस अधिक्षक, पुणे ग्रामीण, जिल्हा पुनर्वसन अधिकारी, उपविभागीय अधिकारी पुणे-शिरुर, पोलिस निरीक्षक शिक्रापुर, तहसिलदार शिरुर उपअधिक्षक भूमी अभिलेख, संबंधित मंडळ अधिकारी यांच्यासमवेत दिनांक १४/१२/२०२१ रोजी एकत्रित बैठक आयोजित करण्यात आलेली होती. त्यामध्ये सर्व संबंधितांना ताबा देणेबाबत सविस्तर सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार सदर क्षेत्रावरील अतिक्रमण काढून दिनांक ११/०३/२०२२ रोजी प्रकल्पग्रस्त यांना ताबा देण्यात आलेला आहे.

****************

## महाराष्ट्र विधानसभा सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

## लक्षवेधी सूचना

श्री.लहू कानडे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे,

"अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यातील मौजे मातुलठाण, सरला, गोवर्धन, महाकालवडगाव, कमालपूर, खानापूर, भामाठाण आदि गोदावरी नदीकाठच्या पूररेषा नियंत्रण रेषेमधील गावांना नवीन गावठाण मंजूर करण्यात आलेले असणे, सन १९७२ मध्ये किंवा त्या दरम्यान जिल्हाधिकाऱ्यांमार्फत वरील सर्व गावांसाठी जमीन संपादन करण्यात आलेली असणे, तथापि सरला -२६७, गोवर्धन -३२८, भामाठाण-३३८, महाकालवडगाव-४१६, कमालपूर-११४, खानापूर -१६३ आणि मातुलठाण-३३८ एवढ्या मोठ्या संख्येने पात्र लाभार्थी असणे, तथापि जिल्हा पुनर्वसन अधिकारी किंवा तहसीलदार यांनी आज पावेतो संपादित गावठाणामध्ये प्लॉट पाडून सर्व लाभार्थ्यांना प्लॉटचे वाटप केलेले नसणे, त्यामुळे अदयापही अनेक लाभार्थी, जुन्याच गावात धोकादायक स्थिती मध्ये राहत असणे, लाभार्थ्यांच्या नावे जमीन नसल्याने शेकडो लाभार्थ्यांना घरकुले मंजूर होऊनही रद्द होत असणे, शाळा, अंगणवाडी, पाणीपुरवठा योजना अशा सार्वजनिक अत्यावश्यक सुविधा पासून ग्रामस्थ वंचित राहत असणे, आणि याबाबत तहसीलदारांकडे सदर प्लॉट वाटपाबाबत वारंवार मागणी करूनही प्रशासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."

## मा.मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे निवेदन

**मातुलठाण**:- सदर गावामध्ये भूखंड वाटपासाठी अभिन्यास तयार करण्यात आला असुन एकुण २०३ प्लॉट पाडण्यात आलेले आहे. त्यापैकी गावठाण विस्तारास पात्र लाभार्थी १७६ होते. परंतू ग्रामस्थांची मुळ गावठाण लगतच नविन गावठाणांची मागणी केली आहे. तसेच तेथील प्लॉट ताब्यात घेण्यास गावक-यांनी नकार दिलेला असुन त्या ठिकाणी २३ कुटूंबे अतिक्रमण करुन वास्तव्यास आहेत.

**सरला**:- सदर गावांत २६७ लाभार्थी कुटूंब असून गावठाण स्थलांतरणासाठी गावक-यांनी विरोध केल्यामुळे ९५ कुटूंब गावात, १३९ लाभार्थी शेतात,३३ लाभार्थी जुन्या गावठाणात वस्ती करून राहत आहेत. असून तेथे ग्रामपंचायत इमारत, अंगणवाडी, जिल्हा परिषद शाळा व समाजमंदीराचे बांधकाम झालेले आहे.

**गोवर्धन**:- सदर गावाचा भूखंड वाटपासाठी अभिन्यास तयार करण्यात आला आहे. या गावात एकुण ३२८ कुटूंबे लाभार्थी असुन त्यापैकी एकुण १२१ लाभार्थ्यांना भूखंडाचे वाटप करण्यात आलेले आहे. सदर गावामध्ये १० घरकुले बांधण्यात आले आहे.

**महांकालवडगाव**:- सदर गावातील सन १९९८ साली सर्वेक्षण करून ४१६ लाभार्थी संख्या निश्चित करण्यात आलेली आहे. नविन गावठाणात १०१ कुटूंब राहत असुन यामध्ये ग्रामपंचायत कार्यालय, ग्रामपंचायत विहिर, पाण्याची टाकी, घरकुल योजनेतील घरे व अंतर्गत रस्ते आहेत.

**कमालपूर**:- सदर गावामध्ये भूखंड वाटपासाठी अभिन्यास तयार करणेत आला असुन गावात एकुण ११४ प्लॉट पाडण्यात आलेले आहे. त्यापैकी गावठाण विस्तारास ८७ पात्र लाभार्थीपैकी ६३ लाभार्थी यांचे नावे प्लॉट वाटप करण्यात आले आहे.

**खानापूर**:- सदर गावाचा भूखंड वाटपासाठी अभिन्यास तयार करणेत आलेला असुन गावात एकुण १६३ प्लॉट पाडण्यात आलेले आहे. त्यापैकी पात्र लाभार्थी १५९ असुन ४ प्लॉट सार्वजनिक उपयोगासाठी राखून ठेवलेले आहे.

**भामाठाण**:- सदर गावात एकुण ३३८ कुटूंबे लाभार्थी आहे त्यापैकी या गावात ७१ कुटूंबे घरे बांधुन व २८ घरकुलामध्ये राहत आहे.उर्वरित २०८ कुटूंबे ही शेतात, ३१ कुटूंबे ही जुन्या गावठाणांत राहतात. संपादन केलेल्या गावात ग्रामपंचायत कार्यालय, प्राथमिक शाळा, मंदीर, पाणीपुरवठा विहीर, स्मशानभूमी इ. सोयी सुविधा उपलब्ध आहेत.

सदर गावठाण विस्तार योजना राबविण्यास बराच कालावधी झाला असल्याने पात्र लाभार्थी संख्या ही नव्याने निश्चित करून प्रस्तावीत गावठाणांत त्यांना प्राधान्याने प्लॉट देण्यात येतील. तसेच या क्षेत्रामध्ये अतिक्रमणे झालेली असुन सदरची अतिक्रमणे नियमानुकूल करण्यासाठी स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात येईल.

************************************************************

रोटा/एच १२९१ [७००-५-२०२२].

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र. १७४**

**श्रीमती श्वेता महाले, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

" महात्मा जोतीराव फुले कर्जमुक्ती योजनेत बुलडाणा जिल्हयातील पात्र असणाऱ्या जवळपास २४ हजार शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळालेली नसणे, छत्रपती शिवाजी महाराज कर्जमाफी योजनेतीलही हजारो शेतकरी कर्जमाफी पासून वंचित असल्याने त्यांना नवीन कर्ज सुदधा मिळालेले नसणे, काही शेतकरी तर दोन्ही योजनेत पात्र असूनही बसले नसणे, त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज कर्जमाफी योजनेचे पोर्टल सुरु करुन अशा शेतकऱ्यांचे अर्ज घेऊन त्यांना कर्जमाफी मिळवुन देण्याची निकड, जे शेतकरी पात्र आहे पण अजून त्यांच्या खात्यात माफी जमा झाली नाही त्यांच्या कर्ज खात्यात माफी रक्कम जमा करणे, हयाव्यतिरिक्त अनेक कर्जदार शेतकरी यांचे निधन झाले त्यामुळे त्यांचे अंगठा देऊन आधार प्रमाणीकरण झाले नसणे, त्यामुळे त्यांच्या वारसांना कर्जमाफीचा लाभ मिळाला नसणे, तसेच त्या मृत शेतकऱ्याच्या खात्याला वारसाचे नाव न लागल्याने नवीन कर्ज न मिळणे, माझ्या चिखली मतदारसंघातील अमडापुर येथील १२० SBI शाखेचे मृत झालेल्या शेतकऱ्याचे वारसांना अजून नवीन कर्ज व माफी मिळालेली नसणे, त्यांना तातडीने कर्ज देण्याची गरज असणे, चांडोळ ता. जि. बुलढाणा येथील SBI च्या शाखेने चुकीची माहिती दिल्याने छत्रपती शिवाजी महाराज कर्जमाफीपासून जवळपास १२०० शेतकरी वंचीत असणे, गत वर्षी कर्जवाटपाचा बुलडाणा जिल्हयाला २४६०.३५ कोटी एव्हढा लक्षांक दिलेला होता त्यापैकी केवळ १०८० कोटी रुपयांचेच वाटप झाले याचाच अर्थ केवळ ४० टक्के कर्ज वाटप करण्यात आले. त्यामुळे बँकांना कर्जवाटप करण्यात अपयश आलेले अपयश, पुढील वर्षी कर्जवाटप करताना दिलेले उददीष्ट पूर्ण करण्यासाठी बँकांवर जबाबदारी निश्चित करण्याची निर्माण झालेली गरज, अजून पर्यंत छत्रपती शिवाजी महाराज व महात्मा जोतीराव फुले कर्जमुक्ती योजने ज्या शेतकऱ्यांना लाभ मिळाला नाही अशा सर्व शेतकऱ्यांना २ लाखापर्यंत कर्जमाफी दयावी अशी होणारी मागणी, याकडे होणारे अक्षम्य दुर्लक्ष यामुळे पसरणारा तीव्र असंतोष, यावरील कार्यवाही तथा उपाय योजना. "

---

### -: मंत्री (सहकार) यांचे निवेदन :-

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत बुलडाणा जिल्ह्यातील १,९४,९५९ शेतकऱ्यांची कर्जखाती अपलोड करण्यात आली आहे. अपलोड करण्यात आलेल्या कर्जखात्यांपैकी १,७९,०८४ कर्जखाती विशिष्ट क्रमांकासह आधार प्रमाणीकरण करण्यासाठी उपलब्ध करण्यात आली आहेत. यापैकी १,७६,०५५ कर्जखात्याचे आधार प्रमाणीकरण करण्यात आले असून उर्वरीत कर्जखात्यांचे आधार प्रमाणिकरण करण्याची प्रक्रीया सुरु आहे. आधार प्रमाणीकरण झालेल्या खात्यांपैकी १,७२,५३४ शेतकऱ्यांच्या कर्जखात्यावर रु. ११३९.७७ कोटी कर्जमाफीची रक्कम जमा करण्यात आलेली असून उर्वरीत शेतकऱ्याच्या कर्जखात्यामध्ये कर्जमाफीची रक्कम जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदर योजनेअंतर्गत पात्र असलेल्या कर्जदार शेतकऱ्यांचे निधन झाल्यास त्यांच्या वारसांनी आधार प्रमाणीकरण करणे आवश्यक आहे. ज्या वारसांनी आधार प्रमाणीकरण केलेले आहे अशा वारसांच्या कर्जखात्यावर कर्जमाफीची रक्कम जमा करण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ अंतर्गत कर्जमाफीसाठी शेतकऱ्यांनी प्रथम अर्ज करणे गरजेचे असल्याने SBI शाखा चांडोळ, ता. जि. बुलडाणा यांनी चुकीची माहिती दिल्याची बाब निर्दशनास येत नाही.

तसेच राज्य स्तरीय बँकर्स समितीच्या दिनांक २८.०२.२०२२ रोजीच्या प्राप्त अहवालान्वये बुलडाणा जिल्ह्यासाठी पिक कर्ज वाटपाचा रु. १८५०.०६ कोटीचा लक्षांक निर्धारीत करण्यात आला होता. त्यापैकी १.४६ लाख खातेदारांना रु. १३५२.२९ कोटीचे पीक कर्जवाटप करण्यात आलेले आहे. यामध्ये जिल्ह्यातील पात्र असणारे शेतकरी ज्यांनी बँकेकडे पिक कर्जासाठी अर्ज केलेला आहे, अशा शेतकऱ्यांना बँकेद्वारे कर्जवाटप केलेले आहे.

*************

१७५

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२२चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. १७५

सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. राम कदम, रवि राणा, अभिमन्यु पवार, डॉ. संदीप धुर्वे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"शेतकऱ्यांच्या सहकारी संस्थांना आर्थिक बळ देण्याकरिता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची स्थापना करण्यात आलेली असून सहकारी तत्त्वावर कृषी व कृषिपूरक उदयोगाला चालना देणारी जिल्हयातील केंद्रीय संस्था म्हणून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक कार्य करीत असणे, तथापि चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक मंडळाने त्यांच्या सर्वसाधारण सभेत जिल्हयातील सेवा सहकारी /विविध कार्यकारी सहकारी संस्थाना आर्थिक सक्षमतेने चालवण्याचे धोरण न ठरविता सहकारी बँक निवडणुकीच्या दृष्टीने विविध कारणे देऊन आभासी सर्वसाधारण सभा घेऊन बँकेच्या पोटनियमामधील दुरुस्ती मंजूर करणे, विभागीय सहनिबंधक यांनी चंद्रपूर जिल्हयाचे भौगोलिक परिस्थिती विचारात न घेता या पोटनियम दुरुस्तीला मंजुरी दिली असणे, चंद्रपूर जिल्हयात ३९५ सेवा, विविध कार्यकारी, आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थापैकी फक्त ३८ संस्था अ आणि ब ऑडिट वर्गात असून उर्वरित सर्व संस्था क ऑडिट वर्गात असणे, सहकारी संस्थांच्या निवणुकीत मतदान करण्याचा अधिकार फक्त अ व ब ऑडिट वर्गाच्या सहकारी संस्थांना देण्याचा निर्णय सभेत पोटनियमात बदल करुन घेणे, तर संस्थेच्या कार्यक्षेत्रातील रहिवासी असणाऱ्या सभासदांना त्या गावी शेतजमीन असली तरी कर्ज मिळणार नाही अशी पोटनियम दुरुस्ती करून सभासदांना कर्ज मिळण्यात अडचणी निर्माण करणे, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सन २०२०-२१ च्या वार्षिक आर्थिक हिशोब पत्रिकेची सखोल चौकशी होणे गरजेचे असणे, सदर संस्थेच्या संचालक मंडळाने बँकेचे सभासद असणाऱ्या सर्व प्रकारच्या सहकारी संस्थेचे सभासद व त्यांच्या कुटुंबीयांकरता शेतकरी कल्याण निधी दरवर्षीच्या निव्वळ नफ्यातून तरतूद केली असुन शेतकरी कल्याण निधीमध्ये अव्यवहार्य निधी वाटप करण्यात येणे, शेतकरी अपघात विमा योजना या केंद्रीय योजनेची अंमलबजावणी करण्यास बँकेच्या संचालक मंडळाने टाळाटाळ केली असणे, रिझर्व बँक ऑफ इंडीया, नाबार्ड व सहकारी खाते यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन न करता चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाने श्री. राजेश्वर कल्याणकर यांना बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावर तीन वर्ष मुदतवाढ देणे, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने नुकतेच १६५ पदे भरण्यास परवानगी दिलेली असणे, अशा प्रकारे चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर काळजीवाहू संचालक मंडळाने बँक अहितेचे अनेक निर्णय घेतले असल्याने मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक १८.०२.२०२१ च्या निर्णयानुसार सदर बँकेच्या संचालक मंडळावर प्रशासक नेमण्याची आवश्यकता असणे, याबाबत उपाययोजना व कार्यवाही ."

---

### -: मंत्री (सहकार) यांचे निवेदन :-

चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सादर केलेली पोटनियम दुरुस्तीची शब्दरचना ही आदर्श उपविधीतील शब्दरचनेशी सुसंगत असल्याने विभागिय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर विभाग, नागपूर यांनी त्यास मंजुरी दिलेली आहे. सदरहू पोटनियमानुसार बँकेने संचालक मंडळ सदस्यांसाठी अ व ब लेखापरिक्षण वर्ग असणे ही पात्रता निश्चित केलेली आहे. परंतू मतदार म्हणुन अ, ब व क लेखापरिक्षण वर्गवारी पुर्वीप्रमाणेच ठेवण्यात आलेली आहे. त्यामुळे बँकेने कोणासही मतदान पासुन वंचित ठेवले नाही.

चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने काढलेल्या दिनांक ०३.०३.२०२१ च्या परिपत्राकान्वये बँकेच्या अंतर्गत असलेल्या ज्या सेवा, विविध कार्यकारी, आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी सभासद करुन घेतले असतील, परंतु जे सभासद सेवा, विविध कार्यकारी, आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थांच्या कार्यक्षेत्राबाहेर राहत असतील अशा सर्व सभासदांचे कमाल मर्यादापत्रक मंजुरीची कार्यवाही झाली नसेल व कार्यक्षेत्राबाहेर राहत असतील अशा सर्व सभासदांना सेवा, विविध कार्यकारी, आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेचे सक्षम अधिकारी यांचे सही शिक्यानिशी रहीवासी दाखला सादर केल्यानंतरच सेवा, विविध कार्यकारी, आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे सभासद करुन घ्यावे, अशा प्रस्तावास बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २७/०३/२०२१ सभेत कार्यात्तर मान्यता देण्यात आलेली आहे.

चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सन २०२०-२१ अखेरचे लेखापरिक्षण केले असून बँकेचा निव्वळ नफा ३.३९ कोटी आहे. बँकेने सन २०२०-२१ अखेर रुपये ४९१.१७ कोटी चे पिककर्ज वाटप केले असुन लक्षांक पुर्तता ९०.१७% आहे. तर सन २०२१-२२ अखेर रुपये ५१२.४७ कोटी चे पिककर्ज वाटप केले असुन लक्षांक पुर्तता ११०.६९ %आहे. बँकेचे सन २०२०-२१ अखेरची नाबार्डची तपासणी पुर्ण झालेली आहे. तथापी अद्याप अहवाल अप्राप्त आहे

शेतकरी कल्याण निधी या योजनेची सुरवात सन २००७ पासुन बँकेने केलेली असून या अंतर्गत सन २०२०-२१ मध्ये ४८ लाभार्थींना रक्कम रुपये १३.७६/- लाख व दि. ०१/०४/२०२१ ते २४/०३/२०२२ पर्यंत २१२ लाभार्थींना रकक्म रुपये ६६.७०/- वाटप करण्यात आले आहे.

सन २०१५ मध्ये नाबार्डने बँकेच्या खातेदारासाठी ऐच्छीक प्रधानमंत्री सुरक्षाविमा योजना (PMSBY) व प्रधानमंत्री जिवनज्योती विमा योजना (PMJJBY) जाहीर केलेली असुन जुन २०१५ पासुन सदर योजनेची अंमलबजावणी बँकेमार्फत करण्यात येत आहे. प्रधानमंत्री सुरक्षाविमा योजना (PMSBY) या योजनेतर्गत ३२४३ खातेदारांचा विमा काढण्यात आलेली आहे. तसेच प्रधानमंत्री जिवनज्योती विमा योजना (PMJJBY) या अंगर्तत ३५४७ खातेदारांचा विमा काढण्यात आलेला आहे.

बँकेने मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. राजेश्वर भिमराव कल्याणकर हे नाबार्ड व सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था मरा, पुणे यांनी निर्धारीत केलेल्या निकषांची पुर्तता करीत असल्यामुळे त्यांची नियुक्ती/निवड करण्यात आली आहे. त्यांना बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी दिनांक ३१/०३/२०२२ ते दिनांक ३१/०३/२०२३ पर्यत मुदतवाढ देण्यात आली आहे.

बँकेच्या मंजुर स्टॉफींग पॅटर्ननुसार एकुण ८८५ पदे मंजुर आहे. त्यापैकी ३६४ पदे दिनांक ३१/१०/२०२१ अखेर रिक्त आहे. त्यापैकी ३६० पदे सरळ सेवेने भरतीचा प्रस्तावास सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था मरा, पुणे यांनी दिनांक १७/०२/२०२२ रोजी मान्यता दिलेली आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या याचिका क्रमांक ४६२५/२०१७ च्या दिनांक २१.०७.२०१७ च्या आदेशानुसार संचालक मंडळ निवडणूक प्रक्रिया स्थगित केली आहे.

************

१७६

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. १७६

श्रीमती श्वेता महाले, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"प्रश्न क्र. २२०८२ अनुराधा अर्बन नागरी पतसंस्था चिखली जि. बुलढाणा ने २००८ च्या कर्जमाफीत केलेली अफरातफर, अनुराधा नागरी सहकारी बँक मर्या. चिखलीच्या सन २००७-२००८ च्या लेखापरिक्षण अहवालामध्ये कृषी कर्ज थकबाकीची रक्कम रु. ८ लक्ष ५४ हजार दर्शविण्यात आली असतांना प्रत्यक्षात बँकेने कर्जमाफी योजनेअंतर्गत राज्य शासनाकडून ४५५ सभासदांसाठी रु. ६६.९४ लाख व केंद्र शासनाकडून १२६७ सभासदांसाठी रु. १.६८ कोटी अशा एकूण १७२२ सभासदांसाठी रु. २.३५ कोटींची रक्कम लाटलेली असणे, याबाबत शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने २०२१ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात तारांकित प्रश्न क्र. २२०८२ च्या दि. १०/०३/२०२१ विचारलेल्या प्रश्नाला दिलेल्या उत्तरात ही बाब सहकार मंत्री यांनी मान्य केलेली असणे, परंतू याबाबत सहाय्यक निबंधक अमरावती यांच्या कडे चौकशी सुरु असून त्याचा अहवाल आल्यानंतर दोषींवर कारवाई करु असे आश्वासन सहकार मंत्री यांनी सभागृहाला दिलेले असणे, अनुराधा नागरी सहकारी बँक मर्या. चिखलीने केंद्र व राज्य सरकारच्या पैशाचा अपहार केल्याचे मान्य करुनही आणि कारवाईचे सभागृहात आश्वासन देऊनही सहकार मंत्री यांनी कारवाई करण्याऐवजी चौकशी समितीच रद्द करुन सभागृहात दिलेल्या आश्वासनाचा भंग करुन दोषींना पाठीशी घालणे, अपहार झाल्याचे सिद्ध होऊनही आणि अपहारीत रक्कम दंडनीय व्याजासाहित वसूल करुन दोषींवर कठोर कारवाईची सभागृहात मागणी असतांनाही जाणीवपूर्वक सभागृहाचे पावित्र्य नष्ट करणे, याकरिता अपहारीत रक्कम दंडनीय व्याजासाहित वसूल करुन दोषींवर कठोर कारवाई करण्याची निर्माण झालेली आवश्यकता, याकडे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे पसरणांरा तीव्र असंतोष, यावरील कार्यवाही तथा उपाययोजना."

---

### -: मंत्री (सहकार) यांचे निवेदन :-

अनुराधा अर्बन को.ऑप. बँक मर्या. चिखली या बँकेस राज्य शासन कर्जमाफी अंतर्गत एकुण ४५५ शेतक-यांसाठी रु.६६,९४,१३१/- व केंद्र शासन कर्जमाफी योजनेअंतर्गत १२६७ शेतकऱ्यांसाठी रु.१,६८,१५,५५४/- रक्कम प्राप्त झाली होती. अशा प्रकारे दोन्ही कर्जमाफी योजनेअंतर्गत १७२२ शेतकऱ्यांसाठी रु.२,३५,०९,७१५/- इतकी रक्कम प्राप्त झाली होती. मात्र बँकेला प्राप्त झालेल्या रक्कमांच्या अनुषंगाने श्री.प्रकाश बाबुराव ढोरे व इतर शेतकरी यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलढाणा यांच्याकडे तक्रार केली होती. त्यामध्ये सदर बँकेस रु.११,९४,१९,१३१/- इतकी रक्कम प्राप्त झाली असून, या रकमेतून बँकेने वाहनतारण कर्ज, नजर गहाण कर्ज इत्यादी कर्जाचा भरणा करुन घेतला व उर्वरित रु.१०,६८,३३,१३१/- इतकी रक्कम थकीत असतांना शासनाकडुन मिळवून शेतकऱ्यांना न देता परस्पर लंपास केली असून, सदर विषयाची चौकशी करुन व्याजासह रक्कम मिळण्याची संबंधित शेतक-यांनी मागणी केली होती. तसेच सदर विषय मा.विधानसभा सदस्य श्रीमती श्वेता महाले यांनी विधीमंडळामध्ये कपात सुचनेद्वारे उपस्थित केला होता. त्यास अनुसरुन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलढाणा यांनी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बुलढाणा यांचे त्रिसदस्य तपासणी पथक गठीत केले होते. सदर पथकाने बँक स्तरावर उपलब्ध माहिती तसेच दस्तऐवजांच्या आधारे दि. २५/११/२०२० रोजी चौकशी अहवाल जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलढाणा यांच्या कार्यालयात सादर केला आहे. सदर अहवालामध्ये त्यांनी नमूद केले आहे की, तक्रारीमध्ये नमूद रु. ११,९४,१९,१३१/- ऐवजी प्रत्यक्षात अनुराधा अर्बन बँकेस कर्जमाफीच्या अनुषंगाने रु.२,३५,०९,७१५/- इतकी रक्कम प्राप्त होऊन शेतकऱ्यांच्या कर्जखाती जमा झाली आहे. मात्र सदर कर्जमाफीची रक्कम सन २००७-०८ या लेखापरिक्षण अहवालात दर्शविलेल्या रु.८.५४ लाख या थकीत रक्कमेशी

जुळत नसून, मुळ कर्जप्रकरणे तपासणी समितीस उपलब्ध झाली नसल्याने त्यावर कोणत्याही अंतिम निष्कर्षास येणे शक्य नसल्याचे चौकशी अहवालात नमूद केले आहे.

उक्त प्रकरणी मा.विधानसभा सदस्य यांनी सदर विषयाबाबत प्रधान सचिव (सहकार) यांना दि.१४.१२.२०२० रोजी निवेदन दिले होते. सदर निवेदनाच्या अनुषंगाने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांनी दि.५/०१/२०२१ च्या आदेशान्वये चौकशी पथकाची नियुक्ती केलेली होती. तथापी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांच्या दि.७/०६/२०२१ च्या आदेशान्वये उपरोक्त नियुक्ती चौकशी पथकामध्ये बदल करुन नविन चौकशी पथकाची नेमणुक करण्यात आली होती. विषयांकीत प्रकरणी अनुराधा को.ऑप.बँकेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४ अन्वये शासनाकडे पुनरिक्षण अर्ज क्र.३३६/२०२१ दाखल केला होता. त्यामध्ये दि.११/०८/२०२१ रोजीच्या आदेशान्वये सदर पुनरिक्षण अर्ज मंजूर केला असून, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांचे दि.५/०१/२०२१ व दि.७/०६/२०२१ रोजीचे आदेश रदद करुन चौकशी समिती खारिज करण्यात आलेली आहे.

तदृनंतर श्रीमती श्वेता महाले, विधानसभा सदस्य यांनी दि.१७/०९/२०२१ च्या पत्रान्वये अनुराधा नागरी सहकारी बँकेस कर्जमाफीमध्ये प्राप्त झालेली अतिरिक्त रक्कम वसुल करुन संबंधितांवर फौजदारी कारवाई करण्याची तक्रार मंत्री (सहकार व पणन) यांचेकडे दाखल केली आहे. श्रीमती श्वेता महाले, विधानसभा सदस्य यांच्या दि.१४/१२/२०२० रोजीच्या अर्जातील मुद्यांबाबत तपासणी पथकाच्या दि.२५/११/२०२० रोजीच्या चौकशी अहवालात निराकरण झाले नसल्याचे निदर्शनास आल्याने श्रीमती श्वेता महाले, विधानसभा सदस्य यांच्या दि.१४/१२/२०२० व दि.१७/०९/२०२१ रोजीच्या निवेदनात नमूद केलेल्या तपशिलाचे गांभीर्य लक्षात घेता, सदर विषयी नव्याने सहकार विभागातील वरिष्ठ अधिका-यामार्फत चौकशी करुन चौकशी अहवाल सादर करण्याबाबत शासनामार्फत दि.२/१२/२०२१ रोजी सहकार आयुक्त यांना आदेशीत करण्यात आले आहे. सदर आदेशाच्या अनुषंगाने सहकार आयुक्त यांनी त्यांच्या दि.६/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये चौकशी पथकाची नियुक्ती केलेली आहे.

उपरोक्त आदेशा विरोधात अनुराधा अर्बन को.ऑप. बँकेने मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपुर येथे याचिका क्रमांक ५३८४/२०२१ दाखल केलेली आहे. मा.उच्च न्यायालयाचे दि.२०/१२/२०२१ रोजीच्या आदेशान्वये सहकार आयुक्त यांच्या दि.६/१२/२०२१ रोजीच्या आदेशास अंतरिम स्थगिती देण्यात आली असून, सदयस्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

************